

घर-दार, आप्तसुहृद, आणि आपापली एक रुळली चाकोरी सोडून....

– वर आभाळ बाकी बर्फ...बर्फ...बर्फ...

# माणूस

६ डिसेंबर १९६९

चाळीस पैसे

समग्र साप्ताहिक

# माणूस

समग्र साप्ताहिक

वर्ष नववे : अंक सत्तावीसावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी ५७३५९

किंमत ४० पैसे : वार्षिक वर्गणी वीस रुपये : परदेशची वर्गणी चाळीस रुपये


'माणूस दिवाळी १९६९' अंकातील पृ. १२३ ते १७५ वरील 'संध्याकाळ' हे श्री. गजानन जागीरदार ह्यांचे आत्मवृत्त त्यांच्या चलच्चित्रपटाइतकेच चित्तवेधक उतरले आहे. सुरुवात केल्यावर पूर्ण केल्याशिवाय पुस्तक खाली ठेववत नाही. 'माणूस'च्या वाचकांना उत्तम दिवाळी भेट दिल्याबद्दल धन्यवाद.

एका लहानशा तपशीलात लेखकाची (निवेदकाची असावी) थोडी चूक झालीशी वाटते. पृ. १५० वरील दुसऱ्या स्तंभात शेवटी पुढील वाक्य आहे — "कॉलेजच्या अर्थशास्त्र मंडळात व्ही. के. आर. व्ही. राव, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, एस. व्ही. काळे ह्यांच्यासारखे बुद्धिमान विद्यार्थी होते."

परंतु व्ही. के. आर. व्ही. राव (संसदचे केंद्रिय शिक्षण-मंत्री) हे सन १९२३ मध्ये मुंबईस विल्सन कॉलेजमध्ये फर्स्ट ईअरमध्ये दाखल झाले व तेथूनच ते प्रथम अर्थशास्त्रात मुंबई विद्यापीठाचे बी. ए. व सन १९२९ मध्ये एम. ए. झाले. त्यांना चान्सेलरचे गोल्ड मेडल मिळाले होते. मी त्यांच्याबरोबर फर्स्ट ईअरमध्ये होतो. ते पुण्यास फर्ग्युसनमध्ये केव्हाही नव्हते. जर ते असते तर त्यांची माझी, मी [illegible] कॉलेजमध्ये असल्यामुळे गाठभेट झाली असती.

२० नोव्हेंबर, १९६९ — प. श्री. पंडित, मुंबई

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



# दिल्ली

## दिनांक २५ नोव्हेंबर

### गैरहजेरी : एक उज्ज्वल भारतीय परंपरा

कोठल्याही देशात एखादी सनसनाटी घटना घडते त्या वेळी तेथला भारतीय राजदूत नेमका गैरहजर असतो अशी आपली उज्ज्वल परंपरा आहे. जवळ जवळ तसलाच प्रकार गेला महिनाभर 'माणूस' बंद राहिल्यामुळे झाला असे म्हणायला हरकत नाही. गेल्या दोन तीन वार्तापत्रांत 'अनामिक' ज्या चौथ्या भारतीय युद्धाची पुनः पुनः जाहिरात करीत होता ते अखेर जेव्हा घडले, तेव्हा राजधानीतला प्रत्येक माणूस उत्सुकतेच्या शिगेला पोचला होता, पण 'माणूस' मात्र पेनला टोपण घालून स्वस्थ बसला होता. तेव्हा आता गेल्या महिन्यातल्या सनसनाटी घटनांकडे एक ओझरता दृष्टिक्षेप टाकणे एवढेच बाकी उरले आहे. घटना क्रमांक एक : सिंडिकेट–इंडिकेट सुंदोपसुंदी अखेर मुद्यावरून गुद्यावर, म्हणजे पत्रावरून पत्रकावर पोचली. म्हणजे एकीकडे अप्पांनी इंदिराजींना काँग्रेसमधून काढून टाकले, तर दुसरीकडे इंदिराजींनी अप्पांना काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून काढून टाकले. परिणामतः यादवीवर सरकारी शिक्कामोर्तब होऊन काँग्रेसची दोन अधिकृत शकले पडली. घटना क्रमांक दोन : जीवशास्त्राच्या नियमानुसार एक राजकीय अमीबा दुभंगून त्याचेच दोन अमीबा झाल्याने पार्लमेंटमध्ये काँग्रेसचे सरकार व काँग्रेसचाच विरोधी पक्ष अशी न भूतो न भविष्यति परिस्थिती निर्माण झाली. घटना क्रमांक तीन : फुटीर ए. आय् सी. सी. सेशनला आठशे पैकी पाचशे भगत गोळा करून अन् पार्लमेंटमध्ये रबातचा हल्ला यशस्वीरीत्या परतवून इंदिराजींनी काँग्रेस आपल्या खिशात – चुकलो, पदरात – पडली आहे हे दाखवून दिले.

यातली सर्वात ताजी घटना म्हणजे दोन–तीन दिवसांपूर्वीचा इंदिराजींचा मेळावा. या मेळाव्यात भाषण करताना, "निजलिंगप्पांनी मला काँग्रेसमधून काढून टाकले आहे, पण ज्याचे हृदय काँग्रेसमध्ये आहे त्याला काढून टाकताच येणार नाही," अशी जाहीर ग्वाही देता देता इंदिराजींच्या डोळयात स्त्री–सुलभ अश्रू उभे राहिले. इतर मंडळींनी आपापल्या मगदुरानुसार अप्पा अँड को. ला यथोचित गालिप्रदान केले व इंदिराबाईंचा उदोउदो केला. पण या मेळाव्याचा आंतरः

कोपि हेतु म्हणजे भांडण सुरू झाल्यापासूनच्या काळात इंदिराजींनी राजकीय हेतुपुरःसर दाखविलेल्या जालीम डावरेपणाला काहींसा मध्यममार्गी मुलामा देणे. बाई साम्यवाद्यांच्या आहारी जात आहेत हा गैर-साम्यवादी विरोधी पक्षांचा आवडता आरोप अप्पावादी काँग्रेसवाल्यांनाही आयता सापडल्याने हा मुलामा आवश्यक ठरला.

## आता पुढे काय ?

मेळावा संपला, आता पुढे काय, हा प्रश्न दोन्ही काँग्रेसमधल्या बऱ्याच मंडळींच्या समोर उभा ठाकला आहे असे दिसते. ज्यांनी मोठ्या हिरीरीने या मेळाव्यात भाग घेतला तेही अप्पांची पदच्युती, टेंपरवारी अध्यक्षांची प्रतिष्ठापना आणि नवीन वर्किंग कमिटीची उभारणी या नाट्यपूर्ण घटनांच्या मालिकेमुळे चक्रावून गेल्या-सारखे दिसतात. मेळाव्यात झालेल्या भाषणात राग अन् कडवटपणा तर होताच, पण एक प्रकारची खंतही होती – झाले, यापुढे दोन काँग्रेस, दोन काँग्रेस अध्यक्ष, दोन वर्किंग कमिट्या, दोन ए. आय् सी सी. ! अन् या सगळ्या गोष्टी दोन–दोन आहेत, तर खुली अधिवेशनेही दोन होणार की काय ? सर्वसामान्य काँग्रेस कार्य-कर्त्याला वाटणारी नेमकी हीच भीती खरी ठरणार असे अप्पांच्या नवीन डावा-वरून वाटते. कारण इंदिरा–काँग्रेसचे खुले अधिवेशन दिनांक २५ डिसेंबरला मुंबईला भरायचे ठरले आहे. त्या आधीच अप्पा–काँग्रेसच्या सुरतेस भरणाऱ्या ए. आय्. सी. सी. चे खुल्या अधिवेशनात रूपांतर करायचे असा हा डाव आहे.

या सगळ्यांतून पुढे काय उद्‌भवणार आहे हे समजेनासे झाल्याने दोन्ही बाजूंचा काँग्रेसमन–इन्–द–स्ट्रीट हतबुद्ध झाला आहे. त्यातल्या त्यात जाणत्या मंडळींना भीती पडली आहे ती म्हणजे काँग्रेसच्या या दोन तुकड्यांपैकी एकालाही यापुढे 'काँग्रेसपणा' राहणार नाही – उलट हे दोन्ही गोट म्हणजे आतापर्यंत वाढू न शकलेल्या विरोधी पक्षांच्या सोयीसाठी बांधलेल्या धर्मशाळा ठरतील. म्हणजे डावी काँग्रेस उजवी काँग्रेस या शब्दप्रयोगात काँग्रेस या नामापेक्षा डावी–उजवी या विशेषणांना अधिक महत्त्व प्राप्त होईल.

## सुभगसिंगांचा सवतासुभा

पक्षात हा गोंधळ, तर पार्लमेंटमध्ये दुसराच. इंदिराजींना काँग्रेसमधून काढून टाकल्यावर त्यांचे सरकार हे काँग्रेसचे सरकार राहिले की नाही हाच मूलभूत प्रश्न पहिल्या दिवशी उपस्थित झाला, अन् जनसंघ–सदस्यांनी तर या 'अवैध' सरकारला प्रश्न विचारण्याचेच नाकारले. रामसुभग सिंगांनी पार्लमेंटमध्ये सवतासुभा मांडल्यावर सभापती धिल्लान यांनी त्यांना निराळ्या खुर्च्या देऊन प्रमुख अधिकृत विरोधी पक्ष म्हणून मान्यता दिल्यावर तर गोंधळात गोंधळ उडाला. गुळाचा गणपती अन् गुळाचा नैवेद्य या धर्तीवर काँग्रेसचे सरकार व काँग्रेसचाच प्रमुख विरोधी पक्ष

या प्रकाराला त्यानंतरी काय द्यावे असा संभ्रम निर्माण झाला. रामसुभग सिंग गटाने आधी काँग्रेस (विरोधी) व नंतर काँग्रेस (संघटना) हे नामांतर म्हणजे 'आधी कोंबडी की आधी अंडे' या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न होता.

## डावा डाव

रामसुभग सिंगांनी उजव्या विरोधकांशी संगनमत करून रबातची तलवार उपसली, तेव्हा त्यांच्यामागे उभ्या असलेल्या निजलिंगप्पांना इंदिराजींचे सरकार उलथून पाडणार नाही याची जाणीव नव्हती असे नाही. पण ते आता अल्पसंख्याकांचे सरकार आहे. आणि साम्यवादी व द्रविड मुन्नेत्र कळहम् अशा परस्पर विरोधी मंडळींच्या पाठिंब्यामुळे तग धरून आहे असे दाखविता येईल अशी त्यांची अपेक्षा होती. ती ही सध्या तरी प्रतिक्रियेमुळे सफळ झालेली नाही. कारण इंदिराजींना हा पाठिंबा तर मिळालाच, पण भडभुड काँग्रेस सदस्यांचाही पाठिंबा मिळाला. त्यामुळे रबातीचा डाव इंदिराजींनी जिंकला.

पण डाव्या मंडळींचा अहम् आता जागा झाला आहे, आणि आता या सरकारला आपण किती वाकवू शकतो हे पाहण्याचा प्रयत्न केल्याशिवाय ते राहणार नाहीत. शिवाय सार्वत्रिक निवडणुकीला तोंड द्यायची सध्या कुणाचीच तयारी नाही. तेव्हा त्या फंदात पडण्यापेक्षा इंदिराजींच्या सापडलेल्या अवस्थेचा दुरुपयोग करून जेथे अधिक सोयिस्कर असा क्रांती-सनात हिशेब मांडला आहे. 'डावे पक्ष इंदिराजींना पाठिंबा देऊ शकतील काय?' या विषयावर एक जाहीर सभा घेऊन या मंडळींनी परवा राजधानीत म्हटले, 'बाई, एक तर आम्ही तुला पाठिंबा द्यायला बांधलेलो नाही, अन् दुसरं म्हणजे प्रसंगोपात्त पाठिंबा देऊ तेव्हा त्याची किंमतही वसूल करू.'

या सभेत एसेमनी इंदिरा-सरकारला 'संशयाचा फायदा' देऊन म्हटले, आपण डाव्या मंडळींनी इंदिराजींना पाठिंबा दिला पाहिजे. कारण सांप्रत कुठलाच विरोधी पक्ष सरकार द्यायला समर्थ नसल्याने इंदिरा-सरकार नाही तर अराजक, हा एकच पर्याय आपल्यापुढे आहे. पण प्रतिबंधक अटक कायद्यासारख्या जनता-विरोधी कायद्याची मुदत त्यांनी वाढवली तर मात्र "आम्ही हे सरकार उलथून पाडू." द्रविड मुन्नेत्र कळहम्चे इरा सेझियन म्हणाले, "काँग्रेसची इतिकर्तव्यता आता संपुष्टात आली आहे. इंदिराजी जोपर्यंत डावीकडे आहेत तोपर्यंतच त्यांना डावा पाठिंबा मिळेल." प्रसोपाचे द्विवेदी म्हणाले, "आम्हाला लोकशाहीची चाड आहे म्हणून आम्ही हे सरकार पाडीत नाही; पण बाईंनी आपला समाजवादी कार्यक्रम जाहीर केला पाहिजे व त्या दिशेने पावले टाकली पाहिजेत." साम्यवादी हिरेन मुखर्जी म्हणाले, "या नवीन परिस्थितीचा फायदा घेऊन विरोधी पक्षांनी जनतेला समाजवादाच्या बाजूला वळविले पाहिजे. इंदिरा-सरकार व लोकशाही या दोन्हींच्या सत्वपरीक्षेचा हा काळ आहे, व या काळात डाव्या पक्षांच्या कार्याचीही कसोटी होणार आहे." मार्क्सवादी

राममूर्ती म्हणाले, "इंदिरा–सरकार समाजवाद प्रस्थापित करील यावर आपला विश्वासच नाही. मात्र गेल्या बावीस वर्षांतल्या कुराज्यामुळे निर्माण झालेला आर्थिक समरप्रसंग दूर करण्यासाठी इंदिराजींनी काही तरी करावे, अशी आमची अपेक्षा आहे. नुसते बँक राष्ट्रीयीकरण पुरेसे नाही. खरी कसोटी म्हणजे त्यांनी हातात घेतलेल्या आर्थिक संस्थांच्या वळावर पैसेवाल्यांच्या झब्बूशाहीला वेसण घातली गेली पाहिजे."

डावीकडे हे, उजवीकडे काय? जनसंघाचे अध्यक्ष वाजपेयी यांनी आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना इशारा दिला आहे की, "मध्यावधी निवडणुकीसाठी तयार रहा. इंदिरा–सरकारने सध्या निवडणुकी होणार नाहीत असा निर्वाळा दिला असला तरी प्रमुख निवडणूक–अधिकाऱ्याने एकदम अशा निवडणुकीची तयारी का चालविली आहे, या विरोधी पक्षांच्या प्रश्नाला त्या नीटसे उत्तर देऊ शकलेल्या नाहीत. यापुढे निर्माण होणारी परिस्थितीच इंदिरा–सरकारला अशा निवडणुकी घ्यायला भाग पाडील, असा वाजपेयींचा होरा आहे. पार्लमेंटमध्ये काँग्रेसच्या सरकारसमोर काँग्रेसचाच प्रमुख विरोधी पक्ष उभा ठाकला, त्याच वेळी मध्यावधी निवडणुकीची वाटचाल सुरू झाली, असे काही जाणकार निरीक्षकांचे मत आहे.

—अनामिक


पुरंदऱ्यांची नौबत

बुलंद बुरूज / हूल / कोजागिरीची रात्र / पंत

फोंडा ! फोंडा !! / नावजी बलकवडे

पिऱ्या बेरड / इमान

आठ शिवकालीन कथा

ब. मो. पुरंदरे

किंमत साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

# प्रक्षुब्ध अहमदाबाद

## एक प्रतिक्रिया

वसंत पळशीकर

अहमदाबादच्या दंगलीची पार्श्वभूमी, त्या दंगलीत घडलेल्या घटना देऊन त्यांचे विश्लेषण करणारा श्री. शरद कृष्णन् यांचा विस्तृत लेख 'माणूस'च्या २५ ऑक्टोबरच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे. तो वाचून मनात उमटलेल्या काही प्रतिक्रिया थोडयाशा विस्ताराने लिहिण्याचा विचार आहे.

अहमदाबादेत काही महिन्यांपासून वातावरण तापत होते. वातावरण तापविणाऱ्या काही घटना त्यांनी दिल्या आहेत. त्यांपैकी अहमदाबाद म्युनिसिपालिटीच्या निवडणुकांच्या वेळी काँग्रेसचे श्री. पंडया यांनी मुसलमानांचा अनुनय केला ही एक घटना त्यांनी सांगितली आहे. श्री. शरद कृष्णन् लिहितात: 'परिणामांची तमा न बाळगता केवळ मतांच्या मोहामुळे अनेक धोकादायक मुसलमानांना जवळ करण्यात आले व त्यांना सवलती देण्यात येऊन त्यांच्या अनेक समाज-विघातक कृत्यांवर पांघरूण घालण्यात आले.' पुढे ते लिहितात : 'काँग्रेसचा विजय हा आपलाच विजय असल्याच्या भावनेने मुसलमानांतील कडवे जातीयवादी अधिक आक्रमक बनले. ही गोष्ट बहुसंख्याकांना मानवली नाही आणि हिंदु-मुस्लीम तेढ वाढीस लागल्याचे अधिक प्रकर्षाने जाण लागले. बारीकसारीक कुरापतींना सुरुवात झाली. मुसलमानांचे धोरण अधिक आक्रमक झाले.' अल् अक्सा मशीद जळित प्रकरणीचा मोर्चा व त्यातल्या घोषणा ही या आक्रमक वर्तनाच्या साखळीतली सर्वोच्च प्रक्षोभक कृती, असे त्यांनी पुढे म्हटले आहे.

अहमदाबादेत दंगल झाल्यावर या मीमांसेचा शोध लावला गेला नाही याची खात्री श्री. कृष्णन् यांनी करून घ्यायला हवी होती असे मला वाटते. उदाहरणार्थ, मुंबईतही प्रचंड मिरवणूक निघाली, घोषणा दिल्या गेल्या, वक्तव्ये झाली. मुंबईत दंगल झाली असती तर नंतर लोक हेच म्हणाले, असते की, निवडणुकीत मुसलमानांचा अनुनय झाला, सवलती दिल्या गेल्या, ते आक्रमक बनले, कुरापती सुरू झाल्या. पण तसे कोणी विश्लेषण केलेले नाही. वास्तविक असे विश्लेषण, दंगल होवो न होवो, करता आले पाहिजे.

मतलब असा की, मतांसाठी अनुनय ही भारतातच काय पण सर्वत्र राजरोस वापरात असलेली पद्धती आहे. सवलती देणे, पाठीशी घालणे या गोष्टी केवळ मुसलमानांच्याच बाबतीत घडत नाहीत. सर्व पक्ष 'धोकादायक' व्यक्ती (म्हणजे गावगुंड) जवळ करण्यावरून परस्परांवर आरोप करू शकतील, व करतातही. काँग्रेसच्या निवडणुकांच्या राजकारणावर, जेथे मुसलमान नाहीत तेथेही सर्रास ही टीका केली जाते. मध्यावधी निवडणुकीत उत्तरप्रदेश व बिहार प्रांती सर्व पक्षांनी गुंडगिरी केली, असे जयप्रकाश म्हणतात.

आता हे शक्य आहे की अहमदाबादेत अनुनय करणे, सवलती देणे, पाठीशी घालणे या बाबतीत एक विशेष पातळी गाठली गेली असेल. ते विशेषपण स्पष्ट करणे, अहमदाबादेच्या परिस्थितीत त्याचा विशेष प्रक्षोभक परिणाम कसा व का झाला ते सांगणे ही श्री. कृष्णन यांची जबाबदारी होती. हिंदु समाजात चिरड निर्माण होईल अशी हिंदूंना उपद्रवकारक समाज-विघातक कृत्ये कोणती? कुरापती कोणत्या घडल्या?

श्री. कृष्णन् यांनी ज्या मोघम पद्धतीने विधाने केली आहेत त्यात मुसलमानांवर अन्याय आहे. हिंदूंच्या मनात अविश्वास, तेढ उत्पन्न करणारी ती विधाने ठरतात; व म्हणून ती बेजबाबदार आहेत असे मला वाटते.

मुसलमानांच्या आगळिकींचे, मुजोरीचे माप त्यांच्या पदरी पुरेपूर घालण्यास हरकत नाही. तसे ते घातलेच पाहिजे. पण आगळीक कोणती, चूक कोणती ते सांगून, आपण त्यांना चूक व आगळीक का म्हणतो ते स्पष्ट करून. म्हणजे, मग, मुसलमानांनाही त्यांचे जर काही म्हणणे असेल तर ते मांडता येईल. त्याच प्रकारच्या चुका व आगळिकी हिंदूंच्या हातून घडल्यास त्यांचे माप आमच्या पदरात टाकता येईल.

रामायणास लाथाडण्याचा प्रसंग श्री. कृष्णन् यांनी सांगितला आहे. या प्रसंगाची वेगळी हकीकत मी श्री. हमीद दलवाईंकडून ऐकली आहे. पण त्यांनी सांगितलेली हकीकत सांगण्यापूर्वी श्री. कृष्णन् यांनी कथन केलेली हकीकत वाचताना माझ्या मनात जे प्रश्न उपस्थित झाले ते सांगतो. 'माणूस'मधल्या हकीकतीप्रमाणे इन्स्पेक्टर खान यांनी 'शेकडो लोकांच्या उपस्थितीत पोथीस लाथ मारली, लाऊड-स्पीकर बंद करविला.' वेळ होऊन गेला, कीर्तन बंद करा, असा आदेश प्रथम दिला गेला असणार. मुळात, हा आदेश दिला जातो कसा? वेळेचे बंधन कार्यक्रम करणारांनी स्वीकारले होते का? अशा कीर्तनांचे कार्यक्रम होतात तेव्हा वेळेचे इतके काटेकोर बंधन पाळले जाते असे पाहण्यात येत नाही. येथेच असा आग्रह का राखला गेला? पोलिस इन्स्पेक्टरने इतरत्र अशा पद्धतीने कार्यक्रम बंद

[पृष्ठ ६१ वर]

# आयुर्विमा महामंडळाची वाटचाल

**प्रा. रा. म. बिवलकर**

गेल्या जुलई महिन्यात या देशातील १४ व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यापासून या देशात राष्ट्रीयीकरणाचे वारे घोघावू लागले आहे. त्यामुळे राष्ट्रीयीकरणाच्या धोरणावर उलट सुलट टीका–प्रतिटीका यांचा भडिमार चालू आहे राष्ट्रीयीकृत उद्योगांची सामाजिक उद्दिष्टे साध्य करताना, सरकारीकरणाचे दुर्गुण त्यात घुसून, त्यांच्या कार्यक्षमतेवर मर्यादा पडतात वा पडू शकतात. या संदर्भात माननीय श्री. चि. द्वा. देशमुख यांनी तेरा वर्षापूर्वी राष्ट्रीयीकृत केलेल्या आयुर्विमा धंद्याच्या वाटचालीचा आढावा इथे घेतला तर तो योग्य ठरावा.

दि. २० जानेवारी १९५६ रोजी रात्री, अर्थमंत्री श्री. देशमुख यांनी आयुर्विमा धंद्याचे राष्ट्रीयीकरण केल्याचे आकाशवाणीवरून जाहीर केले. समाजवादी समाज निर्मू म्हणणाऱ्या सरकारने उचललेले ते महत्त्वाकांक्षी पाऊल होते. सहाजिकच त्यावेळीही टीक-प्रतिटीका अशा भडिमारात तेही सापडले. पण श्री. देशमुखानी पुढे ६।७ महिन्यांच्या आत भराभर पावले टाकून दि. १ सप्टेंबर १९५६ रोजी देशातील सर्व आयुर्विमा कंपन्या आयुर्विमा महामंडळात विलीन केल्या.

अदृष्टात काय आहे हे कुणालाच समजणे शक्य नाही. आणि म्हणूनच आपल्या पश्चात आपल्या कुटुंबीयांना रस्त्यावर पडण्याची पाळी येऊ नये, या दृष्टीने आयुर्विमा महत्त्वाचा. पण बहुसंख्य लोक अशिक्षित. त्याची उत्पन्ने मर्यादित आणि अनिश्चित स्वरूपाचीही. भारतीय शेती म्हणजे पावसाच्या लहरीवरील कसरत. अशा अवस्थेत ज्यांना संरक्षणाची गरज आहे त्यांना आधार नाही, अशी स्थिती होती. नफा–एक दृष्टी ठेवणाऱ्या विमा कंपन्या शहरांच्या बाहेर पडायला तयार नव्हत्या. या देशातील सामान्य नागरिक असुरक्षित राहाणे या देशाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने गैर होते. म्हणूनच आयुर्विमा धंद्याचे राष्ट्रीयीकरण आवश्यक होते. शिवाय, आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण, विशिष्ट व्यक्तींच्या उद्योगात भांडवल गुंत-

**नव्या राष्ट्रीयीकृत व्यवसायांबद्दल जनतेची खात्री पटवायची तर जुने राष्ट्रीयीकृत उद्योग कसे चालतात हे पाहणे ओघानेच आले.**

---

वण वगैरे दोष आयुर्विमा कंपन्यांच्या ठायी वसत होतेच. त्यालाही आळा बसणे जरूर होते. म्हणून श्री. देशमुखांसारख्या जरा डावीकडे कललेल्या मध्यममार्गीयानेही यात पुढाकार घेतला.

गेल्या तेरा वर्षात आयुर्विमा महामंडळाने अपेक्षेबाहेर नेत्रदीपक कामगिरी बजावली आहे. आर्थिकदृष्टया भोंगळ कारभार करणाऱ्या विमा कपन्यांना जे शक्य झाले नसते, ते आज प्रत्यक्षात उतरले आहे. नवे विमे, खेडोपाडीही पोचलेले आयुर्विमा करार, प्रथम विमा उतरविणाऱ्यांची संख्या, आणि उतरविलेल्या विम्याच्या रकमेची सरासरी, या पैकी कोणत्याही वाढनिदर्शकाचा विचार केला, तरी मंडळाचे यश सहज नजरेत भरेल. पण तरीही या यशावर अगदीच डाग नाहीत असे नाही. प्रीमिअमचे महागडे दर, आयुर्विमा मंडळाच्या खर्चाचे वाढते प्रमाण, पॉलिसीचे पैसे मिळण्यात होणारा विलंब आणि दिरंगाई आणि प्रीमिअम न भरल्यामुळे लॅप्स (कालगत) होणाऱ्या विमाकरारांचे वाढते प्रमाण, या गोष्टी मंडळाला खासच भपणावह नाहीत. पण तरीही आपल्या लोकशाही राज्यातील या एका मोठ्या राष्ट्रीयीकृत व्यवसायाने 'तुमचे कल्याण ही माझी जिम्मेदारी' हे आपले ध्येयवाक्य बऱ्याच प्रमाणात जमले आहे यात शंका नाही.

## जमेची बाजू

आयुर्विमा महामंडळाच्या गेल्या तेरा वर्षातील कामगिरीचे मूल्यमापन करताना, जमेच्या बाजू आपण पहिल्याने विचारात घेऊ. या तेरा वर्षांत महामंडळाने नवे विमे जास्तीत जास्त उतरविण्याचा कसोशीने प्रयत्न केण्याचे दिसते. या बाबतीत गेल्या तीन वर्षात तिने नवनवे उच्चांक प्रस्थापित केले आहेत, १९६३–६४ साली ७०२ कोटी ७६ लक्ष रुपयांचे नवे करार अस्तित्वात आणणाऱ्या महामंडळाने ६७–६८ साली ८४४ कोटी ४७ लाखांची मजल मारली; तर ६८–६९ साली ही संख्या

९२९ कोटी ३५ लाखांच्या घरात जाऊन, या देशात एका वर्षी उतरविलेल्या विमा करारांचा नवा उच्चांक प्रस्थापित झाला. १९६३–६४ साली ७०३ कोटींचेच विमा करार होते; पण एकूण १६ लक्ष पॉलिसीज् दिल्या गेल्या होत्या. त्या वर्षीचा विशेष हा की यंदा फक्त १४ लक्ष ५४ हजार पॉलिसीज् दिल्या गेल्या असूनही विमाकरारांच्या रकमेने ९२९ कोटींचा उच्चांक गाठला. याचा अर्थ असा की गेल्या वर्षा दोन वर्षात औद्योगिक व शेतमालाच्या उत्पादनात झालेली वाढ, सर्वसामान्य जनतेच्या उत्पन्नात झालेली वाढ आणि देशाच्या निर्यात व्यापाराची सुधारलेली परिस्थती यामुळे बचतीकडे लोकांचा कल वळलेला दिसतो व त्यामुळेच विमाकरारांची रक्कम वाढली असावी.

आयुर्विम्याचे तत्त्व जास्तीत जास्त लोकांच्या गळी उतरविण्यातही महामंडळ यशस्वी झाले आहे. १९६८–६९ साली उतरविलेल्या एकूण विम्यांपैकी ५९·५ टक्के विमेदार पहिल्या प्रथमच विमा उतरविणारे होते, ही याची साक्ष म्हणता येईल.

आयुर्विमाकरार म्हणजे अशाश्वत जीवनात शाश्वतता आणण्याचा प्रयत्न. त्या दृष्टीने विम्याची रक्कम जास्त असणे जरूर असते. उतरविलेल्या विम्यावर विमा रकमेची सरासरी वाढणे हे त्याचे द्योतक म्हणता येईल. प्रती विम्यामागे ही रक्कम १९६६–६७ साली रु. ५४५६ होती, तर ६७–६८ साली ती रु. ५९१३ झाली, व ६८–६९ साली ही सरासरी ६३९० रुपयांच्या घरात गेली. हेही महामंडळाच्या टोपीत एक नवे पीसच म्हणायला हवे ! याशिवाय ६७–६८ साली हजार ते ५ हजारांचे विमे उतरविणारांची संख्या ६७·८ % एवढी होती, तर ती टक्केवारी १९६८–६९ साली ७४ झाली आहे. याचाही अर्थ हा की, विमामहामंडळाने कमी उत्पन्न असणारांच्या गळी हे तत्त्व उतरविण्याच्या दृष्टीने कसोशीचे प्रयत्न चालविले आहेत.

विमामहामंडळाने गेल्या २१३ वर्षात विमाकरारांची संख्या प्रतिवर्षी सरासरी १०% नी वाढविली आहे. मंडळाने ग्रामीण विभागातील काम वाढविण्याचाही चंग बांधला आहे. १९६८–६९ साली उतरविलेल्या एकूण विमाकरारांपैकी ३२·९ टक्के विमे ग्रामीण विभागातील होते, आणि त्या विमाकरारांवरील एकूण विमारक्कम देशातील एकूण विमारकमेच्या २५·५ टक्के एवढी होती. आणि यांतील ८१·३% विमेदार प्रथमच विमा उतरविणारे होते. हे आकडे या दृष्टीने बोलके म्हणायला हवेत. शहरी भागांतील ही टक्केवारी (प्रथम विमा उतरविणारांची) ६२·१% एवढीच आहे. हीही गोष्ट इथे विचारात घेतली की, विमामहामंडळाने ग्रामीण विभागात काम वाढविण्यावर घेतलेले श्रम नजरेत भरतात्. पण तरीही ग्रामीण विभागातील हे काम वाढायला हवे आहे. कारण तिथेच विम्याच्या शाश्वतीची जरूरी अधिक आहे. त्या दृष्टीने महामंडळाने पावले उचलली आहेत असे दिसत नाही.

## ग्रामीण विभागाच्या गरजा

या देशातील विमाधंदा पाश्चिमात्य पद्धतीने आखलेला होता व आहेही. औद्योगिक दृष्टया पुढारलेल्या पाश्चिमात्य राष्ट्रांतील बहुसंख्य मंडळी नियमित उत्पन्न मिळविणाऱ्या गटातील असतात. या उलट भारतातील ७०% जनता शेतीवर उपजीविका करणारी, अशिक्षित, अगर अर्धशिक्षित अशी आहे. त्यांचे उत्पन्न लहरी पावसावर अवलंबून. ते नियमितपणे हाती पडणे अर्थातच कठीण. त्यामुळे त्यांच्या समस्या, गरजा, सोईच्या वेळा अगदीच वेगळया. अशिक्षितपणामुळे व अनेक वर्षे दारिद्रयात काढल्यामुळे त्यांचा दृष्टिकोनही वेगळा. या परिस्थितीची दखल जुन्या विमा कंपन्यानी घेतली नाही, हे एकवेळ समजू शकते. पण राष्ट्रीयीकृत विमामहामंडळानेही गेल्या तेरा वर्षात या दृष्टीने प्रयत्न करू नयेत हे गैर वाटते.

शेतकऱ्यांच्या गरजा विचारात घेऊन नवे विमाकरार अस्तित्वात आणणे, विमा हप्त्याचे दर त्या अनुरोधाने आखणे, ते भरण्याची वेळ शेती व्यवसायाच्या सोईने ठरविणे, अशिक्षित आणि अर्धशिक्षित ग्रामीण जनतेला सहज समजतील अशा पद्धतींचा वापर करणे, शक्यतो विम्यासंबंधीची सर्व माहितीपत्रके, पत्रव्यवहार, विमा करार, विमादाराच्या मातृभाषेत झाले पाहिजेत, यावर कटाक्ष ठेवणे या गोष्टी आयुर्विमा महामंडळाने त्वरित करायला हव्यात. त्याशिवाय ग्रामीण भागात विम्याचे तत्त्व खऱ्या अर्थाने पोचविणे शक्य होणार नाही. या देशातील कुठलीही संस्था या देशाच्या परिस्थितीच्या अनुरोधाने आपले मार्ग बदलणार नसेल, तर तिची सामाजिक व आर्थिक उद्दिष्टे कधीच साध्य होऊ शकणार नाहीत.

या देशातील सरासरी आयुर्मान गेल्या ३०।४० वर्षात झपाटयाने वाढत आहे. एकेकाळी २३ असलेले सरासरी आयुर्मान आज ५०।५२ एवढे झाले आहे. पण तरीही सरासरी आयुर्मानावर व मृत्युप्रमाण (Mortality rate) आधारलेल्या विम्याच्या हप्त्यांच्या दरात गेल्या कित्येक वर्षात फरक पडलेला नाही. सरासरी आयुर्मान वाढल्यावर हे दर कमी व्हायला हवे होते. पण राष्ट्रीयीकृत महामंडळ अस्तित्वात येऊन १३ वर्षे उलटली, तरीही त्याबाबतीत काही विचार करण्याचे विमामहामंडळाच्या मनातही येऊ नये, ही गोष्ट स्पृहणीय नाही. विमादर जास्त असले की कित्येकांना विमा उतरविणेच परवडत नाही. किंवा हवा तेवढा विमा उतरविणे जमत नाही. ही गोष्ट विचारात घेऊन, विमाधंदा वाढविण्याच्या दृष्टीने मंडळाने भराभर पावले उचलली पाहिजेत.

१९६८–६९ साली विमामहामंडळाचा एकूण खर्च २७·५२ टक्क्यावरून २७·५४ टक्क्यावर गेला. आणि वार्षिक खर्चाचे प्रमाणही १५·९० टक्क्यावरून १५·९१ टक्क्यावर गेले, असे मंडळाचा गतवर्षीचा अहवाल दाखवितो. खर्चाचे वाढते प्रमाण असल्यामुळे एक तर विम्याचे दर उतरविणे महामंडळाला शक्य होत

नाही आणि विमादारांना अधिक बोनस देणेही जमत नाही. प्रतिवर्षी हजार रुपयांच्या विमा रकमेमागे १६ रु. बोनस देणारे महामंडळ फक्त १·६ टक्के एवढाच बोनस देते आणि विमा धंदा वाढविल्याची टिमकी वाजविते, असे सामान्य माणसे बोलतात ते यामुळेच. आयुर्विम्यात गुंतवलेली रक्कम नफा अगर व्याज मिळविण्याकरता गुंतवलेली नसते हे खरे, पण तरीही विमामहामंडळाचे बोनसचे दर फारच कमी आहेत यात शंका नाही.

## एजंटांकडून अपेक्षा

गेल्या २।३ वर्षांत कालगत (lapse) होणाऱ्या विमाकरांची संख्या घटविण्याचा प्रयत्न महामंडळाने केला आहे असे दिसते. कालगत होणाऱ्या विम्यांची संख्या १९६६–६७ साली ७·४% होती ती ६७–६८ साली ७% वर आणि ६८–६९ साली ६·३% वर आली ही गोष्ट चांगलीच. पण ही टक्केवारी आणखी खाली उतरविण्याच्या दृष्टीने, आपले वार्षिक विमा उद्दिष्ट गाठण्याकरता कशीतरी व कुणाच्या तरी माथी विमा पॉलिसी मारणाऱ्या विमा एजंटांना आवरायला हवे. विमादाराची सोय, आर्थिक परिस्थिती इत्यादी विचारात घेऊनच नवे विमे उतरविले जावेत. विमादारांना वेळोवेळी योग्य ती माहिती पुरवून मार्गदर्शन करण्याचे काम एजंटांनी केले पाहिजे यावर मंडळाने भर द्यायला हवा. कालगत विम्यांचे प्रमाण जास्त असणे म्हणजे तेवढ्या प्रमाणात मंडळाला अपयश आले असेच मानले पाहिजे. बचत योजनांची लक्ष्ये गाठण्याकरता सरकारी अधिकारी वापरीत असलेल्या क्लृप्त्या इथे उपयोगी ठरू नयेत !

आयुर्विमा महामंडळ, पत्रांना वेळेवारी उत्तरे देत नाही; विम्याच्या रकमा देण्यात दिरंगाई आणि विलंब करते, सामान्य विमादाराला योग्य तेवढे कर्ज देण्यात काकू करते. असे अनेक आरोप केले जातात. ते बव्हंशी खरेही आहेत. मृत्यूमुळे अगर विमाकरारांची मुदत संपल्यामुळे विमारकमांची निर्माण झालेली मागणी किती पुरी केली याचे हे आकडे पहा. गतवर्षी मंडळाने ६६ कोटी २६ लाखांच्या रकमा या पोटी विमादारांना आदा केल्या; पण ६९ कोटी २२ लाखांच्या रकमा द्यायच्या असूनही दिल्या गेल्या नाहीत. का ? तर कुठे वयाचा दाखला नव्हता (?), कुठे वारसदार नोंदला नव्हता, कुठे हवे ते कागद बरोबर भरले गेले नव्हते. मग विमा एजंट आणि विमा विस्तार अधिकारी काय करीत होते ? याची दखल घ्यायला नको का ? विम्याची रक्कम आदा करायची वेळ येईपर्यंत वयाचा दाखला अगर वारसदाराची नोंद झाली नव्हती याचा अर्थ एजंट काम करीत नाही, नुसतेच कमिशन खातो असा होतो ! विम्याची रक्कम वेळेवारी आदा झाली नाही म्हणजे विमादार तर नाराज होतोच, पण नवे विमेदारही विमा काढायला बिचकतात. धंद्याच्या दृष्टीने या गोष्टींची दखल महामंडळाने त्वरित घ्यायला हवी.

देशात राष्ट्रीयीकरणाचे वारे घोंघावत असल्याने विमामहामंडळाने न केलेल्या गोष्टींची यादी प्रकर्षाने लक्षात येणे अगदी सहाजिक आहे. नव्या राष्ट्रीयीकृत व्यवसायांबद्दल जनतेची खात्री पटवायची तर जुने राष्ट्रीयीकृत उद्योग कसे चालतात हे पाहाणे ओघानेच येते. त्या दृष्टीने विमामहामंडळाने अनेक गोष्टी करायला हव्या आहेत. आपले भांडवल गुंतवणुकीचे धोरण अधिक व्यवहारी बनवायला हवे आहे. आपली कारभार यंत्रणा कार्यक्षम बनवायला हवी आहे. ग्रामीण जनतेकरता नवे विमे, सोयीचे हप्ते, नवी धोरणे अंमलात आणायला हवी आहेत. विमादर उतरवायला हवे आहेत, खर्च कमी करायला हवे आहेत. बोनस वाढवायला हवा. आपल्या कार्यकर्त्यांत उत्साह निर्माण करायला हवा. कालगत विम्यांचे प्रमाण घटवायला हवे. विमा रकमा वेळच्या वेळी आदा करण्याची तत्परता दाखवायला हवी. प्रत्येक राष्ट्रीयीकृत व्यवसाय म्हणजे एक आव्हान असते याची दखल शासकांनी घ्यायला हवी.

□ □ □


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन



# रायगड- एक बेभान चढणे

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

किल्ल्यास एक दरवाजा थोर आयब आहे
याकरितां गड पाहून एक दोन तीन दरवाजे
तश्याच चोर दिंड्या करून ठेवाव्यात. त्यामध्ये
हमेशा राबत्यास पाहिजे तितक्या ठेवून
वरकड दरवाजे व दिंड्या चिणून टाकाव्या–

*आज्ञापत्र व राजनीती*

किल्ल्यांच्या दरवाजांविषयींचा वरील संकेत निर्माण करताना श्रीशिवछत्रपती आणि त्यांचे सचिव यांचे दृष्टीसमोर देवगिरीचे पतन असले पाहिजे. केवळ एकच दरवाजा असल्यामुळे तो तेवढा शत्रूकडून हस्तगत केला जाताच त्या अतिशय मजबूत किल्ल्याचा पाडावही सहज होऊ शकला. तेव्हा मग नवे किल्ले उभारताना किंवा जुन्यांची पुनर्रचना करताना त्यांनी या दुर्गांना एकीहून अधिक वाटा करून ठेवल्या. वेळी मुख्य वाट रोखली असता दुसऱ्या वाटेने निसटता यावे हा हेतु.

रायगड हा अठ्ठावीसशे फूट उंचीचा पर्वत चहू अंगांनी ताशीव कडा. महाद्वाराकडे जाणारी एकच एक वाट, तीही दीडदोन फर्लांगपर्यंत अदमासे दीड हजार फूट उंचीच्या कड्यातळून. महाद्वार हे आम जनतेस ठावे असलेले एकच द्वार. अतिबळकट. बेलाग. दो बाजूस प्रचंड डेऱ्यांसारखे दोन अजेय बुरुज. या वाटेपलीकडे गड चढायची दुसरी वाट नाही, असा समज चहू मुलखी रूढ.

पाच सहा वर्षांपूर्वीपर्यंत मीही तसेच गृहीत धरून चालतो होतो. वाघदरवाजा नामक एक वाट कोंडेखळीच्या खळग्यात आहे, हे ठावे असून देखील.

पहिल्या दुसऱ्या फेरीतच आइकले, की इथे या घळीत कुठे तरी एक लहान दरवाजा आहे. त्याचे मूळ नाव वाघदरवाजा. आम्हाला नावांचा अपभ्रंश करायची मोठी वाईट सवय. आम्ही त्याचे नामकरण केले चोरदरवाजा ! जगदीश्वरा-जवळील दारुकोठाराजवळ त्या नावाची पाटी होती. अगदी कड्याशी जाऊन पाहिले तर तो डोळे मिचकावून गेला होता. कुणी दाखवडा भेटला नाही. तेव्हा मग निबिड जाळ्यांतून वाट काढीत, कपडे फाडून घेत, कडे उतरून त्यापाशी जाऊन उभा राहिलो होतो. विस्मयाने तो न्याहाळला होता. पूर्वी कधी काळी दगड रचून तो चिणून टाकला होता खरा, पण मी प्रथम पाहिला ते वेळी माथे-पट्टीकडील काही भाग मोकळा झालेला होता. त्या मार्गे दरवाजा ओलांडून पली-कडील खोवणीत उतरलो होतो. टेपे पार करीत पाणलोटाच्या तळाशी असलेल्या तसराळ्यात पोचलो होतो. तिथपासून खालपर्यंत भिंतीसारखा उभा असलेला आठेकशे फुटांचा कडा नवलाने न्याहाळला होता. कोंडेखळीत जमा होणारे पाणी याच वाटेने धबाधबा खाली कोसळते. त्याच्या वहावामुळे कडा गुळगुळीत झाला आहे. थोडके त्याचे पोट खपाटीसच गेले आहे. तसराळ्याच्या टोकाशी पालथा पडून हे दृश्य न्याहाळले होते. इथून पाळण्यात बसून खाली उतरणेच काय ते शक्य आहे, असा समज त्या वेळी मनी रुजला होता. या वाटेने वर चढणे अगदी



अशक्य आहे, अशीच धारणा झाली होती. त्या दरवाजाविषयीचे मोठे कुतूहल त्या वेळी मनी उपजले होते.

पुढे जेव्हा जेव्हा गडावर स्वस्थपण लाभले, त्या त्या वेळी त्या दरवाजाचा भवताल न्याहाळला. एखादा शंकू उभा कापावा तसा हा कोंडेखळीचा खळगा. चंद्रकोरीच्या आकाराचे हे एक प्रचंड लवण. गच्च झाडीने झाकलेले. हा शंकू उभ्या कड्याने कापला गेला आहे. चंद्रकोरीच्या एका अंगास आहे कुशावर्त, तर दुसऱ्या टोकास बारा टाक्याजवळील दारूकोठार. अदमासे शंभर माणूस बसेल, अशी निसर्ग निर्मित घळ याच वेचक्यात कुशावर्ताकडील बाजूस आहे. मध्यभागी खांब सोडीत आतपर्यंत खणीत नेलेली पाण्याची टाकी, म्हणजे रायगडाच्या चैत्य-कालीन निर्मितीचा पुरावा. तोही याच लवणात आहे. काशीबाईसाहेबांची समाधी याच लवणात. गडावर इतके विस्तीर्ण, इतके समृद्ध, इतके महत्त्वपूर्ण लवण दुसरे नाही. कविकलशाचा वाडा, कारखानीस, पोतनीस, आदी अधिकाऱ्यांचे घरटे, बामणवाडा, त्यामधील तलाव, इत्यादी अनेक अवशेष याच खळग्यात आहेत, आणि याच्या अगदी तळशी वाघदरवाजा.

लवणातून दरवाजापाशी उतरणारे पाणलोट जे पाणी घेऊन येतात, ते नीट बांधून कड्याखाली काढून दिले आहे. पाण्याचा हा मारा टाळून उजव्या हातास नीट काटकोनात दरवाजा उभारला आहे. बांधकाम लहानसे, पण मजबूत, रेखीव आहे. तळपट्टी ते माथापट्टी अशी उंची अदमासे बारा फूट. आतील अंगास दो बाजूंना पहारेकऱ्यांसाठी देवड्या. अडसर अडकवायची गल. लाकडी फळ्यांसाठी खोबणी. फळ्या मात्र गायब.

दरवाजाच्या दोन्ही बाजवा धरून शंभर शंभर हात तटबंदी. केवळ दरवाजातील पाहाऱ्यावर विसंबून न राहता तशा त्या अडचणीत देखील पाहाऱ्यांच्या एकूण पांच चौक्या विखुरल्या आहेत, यावरून या दरवाजाविषयी घेतलेली दक्षता ध्यानी यावी.

□

या दरवाजावाटे केवळ उतरताच येईल, अशा मनी मूळ धरून असलेल्या समजास पहिला धक्का अदमासे सहा वर्षांपूर्वी, या कड्याखाली वरचे धनगर नागली करू लागले, तेव्हा बसला. आइकले, की एक धनगर या कड्यावरून चढून गडात येतो जातो. मनी अगदी नवल दाटले. त्या धनगराला गाठून विचारले,

" तू कोंडेखळी चढून आलास ? "

धनगरासारखे कोंदटवाणे हसत तो बोलला,

" व्हय्–व्हाय पर–"

" नेहमी त्या वाटेनं चढतोस ? "

" ही माकडं हो ! नागलीचा सत्यानास करत्यात–त्यांन्ला हाकाया–"

हे माझ्या ध्यानी कसे आले नव्हते ? या वाटेने माकडे वावरत असलेली मी

अनेकदा पाहिली होती. पण ती या धनगरांची गुरू बनतील, हे मात्र ध्यानीच आले नव्हते.

तपास करता कळले की माकडे नागलीच्या शेतात शिरतात. हे संकट आले की शेताचे वाटोळे. उभ्या नागलीची, बोंडे लपालपा तोंडात कोंबून ती गालफडांत साठवून ठेवायची. पीक कापले, की कापल्या मुठीभोताली जमायचे. कुणी हाकारी धावला, की मूठच उचलून पळायचे. यांच्यापासून पिकाचे रक्षण अगदी गरजेचे. धनगर यांच्या मागे लागतात. ती पळू लागता कड्याशी भिडतात, आणि हा हा म्हणता एवढा आठशे फुटांचा कडा चढून माथ्यावर पोचतात. रिशीला पेटलेले धनगर त्यांना हाकारीत मागोमाग वाघदरवाजा गाठतात. गडावरच जन्म घालविलेले धनगर—त्यांना कडेकपारींचे काय भय !

ठरवले, की कुण्या धनगराला बरोबर घेऊन आपणही याच वाटेने हे साहस करायचे. भाद्रपद आश्विन हा कडेकपारी चढायसाठी उत्तम ऋतु. कड्यावर उगवलेले गवत या दिवसांत पिकून पक्के होते. वर चढताना हाती धरायला गवताचा ठोंब उपयोगी पडतो.

¤

गडावर माझी एक बहीण राहाते, साऊ रावजी अवकीरकर.

ती धनगरीण आहे. अक्षरशत्रु. मी काहीबाही लिहीत असतो, याचा तिला मागमूस देखील नाही. तिला एवढेच ठावे आहे, की हा बापया वारकरी असल्यासारखा नियमाने वर्षातून सताठदा गडावर येतो, आणि अवशेष पालथे घालीत पडक्या भिताडांमधून वणावणा हिंडतो. स्नेह जमून गेला. मी गडावर गेलो, की कितीकदा तिच्या इथले दहीदूध खातो. तिच्या घरी जेवतो. तिला काही औषधपाणी लागले, तरी ती माझ्यापाशी गाऱ्हाणे करते, मी पुढल्या वेळी तिला ते नेऊन देतो. साऊची उमर आहे बावन वर्षे. तिचा घो रावजी आहे साठा वर्साचा.

अचानक ऐकले, की गेली दोनतीन वर्षे. कोंडेखळीत वाघदरवाजाखाली रावजीनानाच नागली रोपतो आहे साऊचा थोरला ल्योक विठ्ठल अन् रावजी सडे असले, की याच वाटेने कडा चढून येतात. वा ! ही तर घरचीच सोबत !

परवा गडावर पोचताच रावजीला म्हणालो,

"नाना, या खेपीस तुझ्याबरोबर कोंडेखळी चढून येणार. नेशील ?"

त्याने क्षणभर मजकडे पाहिले. त्याला ठावे होते, की मी कडेकपारी चढून येतो. मान हालवून तो हो म्हणाला. त्याच्या मनी भरवसा, की या आक्रीतात मी मागे सरणार नाही.

दुपारी दोनला निघायचे ठरले.

¤

ठरवले खरे, पण क्षणभर मनी कातरपण डोकावले. चढायचा आहे आस्मान-

वेधी कडा. वाट रुळलेली नव्हे. अगदीच अनगड. या धनगरांनी आणखी एक अगोचर करून ठेवलेले. कडयावर माकडे स्पष्ट दिसावीत, म्हणून त्यांनी कड्याला विस्तव घातला. गवताचे सगळे ठोंब जळून गेलेले. भरीस भर म्हणजे निघताहोत दुपारी. कडा पश्चिमेकडे. अवघा डोंगर लहालहा तापलेला. कड्यावर मृगजळ धावत असणार. तापल्या तव्यावर पावले टेकावीत, तीच गत होणार आहे.

घसरलो तर ? तोल गेला तर ? आधार निखळून हाती आला तर ? पायांखालचे मुरमाट ढासळले तर ?

पण इथे रानात मरणभय तर नेहमीच घिरट्या घालीत असते. आदल्याच रात्री मनोऱ्यात झोपलो होतो. साडेदहाचा सुमार. गच्च अंधार. एकदम करंगळीला काहीतरी चावले. जागा झालो. बॅटरी लावून पाहिले. करंगळीवाटे रक्त झरू लागले. आग होऊ लागली. उठून बसलो.

काय करू ? काय चावले असेल ?

इथे रानउंदीर वावरतात. कदाचित त्यांतला एखादा चावला असेल. पण मग ही आग कशी ? साप तर चावला नाही ? पलीकडील खेपेस इथे मनोऱ्याच्या वाटेवर एक सरपटते मारले होते. कदाचित साप विखारीही असेल. त्याविना असे करंगळीभर भाजल्यासारखे होणार नाही.

जर विखार असेल, तर लगेच डॉक्टर गाठून इंजेक्शन घेतले पाहिजे. पण लगेच म्हणजे कधी ? त्यासाठी गड उतरून जायला हवे. खाली पाचाडला मुक्कामाची बस आहे. ती सुटणार सकाळी. महाडला पोचायला साडेनऊ होणार. मग डॉक्टर. मग इंजेक्शन. म्हणजे कितीही धावाधाव केली, तरी बारा तासांपेक्षा आधी काही इंजेक्शनची भेट व्हायची नाही.

तर मग उगीच आरडा तरी कशाला करू ? व्हायचे असेल ते होईल. विक्सची डबी होती ती उघडून बोटभर फासले. बसून राहिलो. लीना-वृंदा शेजारी गाढ झोपल्या होत्या. त्यांनाही जागे केले नाही. अर्धा पाऊण तास फणफण होत राहिली.

त्यानंतर हळूहळू ती शमू लागली. गुंगी आली. अंथरुणावर पहुडलो. पहाटे जाग आली, तेव्हा आग शमली होती. म्हटले, की साप नाग नव्हता. उंदीरच होता.

असा मरणाच्या अन् जीवनाच्या भरतभेटीच्या दारी वावरतो आहे. तेव्हा मग कड्यावरून घसरलो तर घसरलो. याहून उमदे मरण दुसरे कुठले असणार ?

थट्टेत माई–अक्का-वहिनीला म्हणालो,

"परत न आलो, तर साऊला भाऊबीज म्हणून पाचशे रुपये द्यायचे. माझ्या संग्रहातली नाणी मात्र राजूला द्यायची–"

ते लहानगे मूल हर्षाने फुलून हो म्हणाले.

□

महाद्वारातून किल्ला उतरायला प्रारंभ केला, आणि निम्म्यावर असलेल्या मशीदमोर्चापर्यंत सरळ वाटेने आलो. तिथे वाट सोडून दिली, आणि डावीकडे वळलो. हिरकणीला वळसा घालीत गडाभवती करगोटयासारखी पायवाट धावते, तिने चालू लागलो. डाव्या हातास निरखतावेळी डोईचे पागोटे भुईवर पाडणारा तुंग कडा. उजवीकडे उतरत्या रानापलीकडे दूरवर इथे तिथे पसरलेले वाळसुरे. डाव्या बाजूच्या कड्यावरील एकेक खूण पटू लागली. ही माथ्यावर हिरकणी. ते समोर राण्यांच्या हवा खायच्या मैदानाचे टोक. त्याच्या पलीकडे कुशावर्तावरील इमारती आहेत—केवळ जाणवतात, दिसत नाहीत.

पायांतळींची वाट धनगरांनी चांगली रुळवलेली आहे. या उन्हातही तिच्यावर सावली आहे. माझे साथी तुकशेट शेडगे अन् रावजी अवकीरकर नाना परीचे बोलताहेत, पण तिकडे माझे लक्ष नाही. मी वरची मकाणे न्याहाळण्यात गर्क आहे.

कड्याच्या पोटाशी असलेली विवरे दिसताहेत. घारींनी शिटून त्यांच्यावर पांढुरक्या खुणा उमटवल्या आहेत. मनी म्हटले, की दोन अडीच मैल अंतर चाललो, अजून वाघदरवाजा दिसत कसा नाही ?

उजव्या हातास एक धनगरी वाडा. तिथून वाट एकदम डावीकडे वळली, अन् समोर आले कोंडेखळीचे लवण ! पाठोपाठ तो भेव दावणारा आठशे फुटी कडाही दिसला. आकाशाएवढा. त्याहूनही उंच. अर्धाच क्षण अंगभर सरसर धावून गेली. पण आता दोर कापून टाकले होते. उरले होते कडा चढून जाणे !

एका झाडाखाली वळून रावजी बोलला,

"आप्पांनू, खिनभर टचेका. दीस वाईच ढळूं द्या. आनी ह्या तुमचा बूट घालून वर चढूं नका हो !"

घड्याळात पाहिले, तर साडेतीनचा सुमार होता. सावलीत बसलो, आणि समोरचे आव्हान न्याहाळू लागलो. बसलो होतो तिथून आठदहा हातांवर रावजीचे शेत सुरू होत होते. शेशंभर फूट रुंदीचे ते शेत अतिशय ढाळ असलेले. ते थेट कड्याच्या तळाशी चिकटले होते. रावजीची पोर माकडांवर राखण करण्यासाठी म्हणून एका धोंड्यावर बसून आम्हाकडे चमत्कारून बघत होती.

तळापासून कड्याचा उंचावा सुरू होत होता. जणू ओळंब्यात तासावा, तसा. अदमासे सहाशे फूट उंचीचा. वरती शंभर फुटांचा खडकाळ ढाळ. या सगळ्या कड्यात गवताच्या जळक्या ठोंबांपलीकडे काहीही दिसत नव्हते. क्वचित् कुठे एखादे खडकाळ टेंगूळ वर आलेले. नव्हती वाटेची खूण, की नव्हता पावटीचा माग. आमच्या उजव्या हातास पाणलोटाने निर्माण केलेले खोल पोट होते. खूप निरखले, पण कडा कोण्याबाजूने चढून जायचा याचा अदमास येत नव्हता. जड-मूढासारखा कडा न्याहाळीत बसून राहिलो.

वरचे लवण. पाणलोटासाठी बांधून काढलेली नाळ. डाव्या हातास वाघदरवाजा.

या सगळ्याची जणू कपाळपट्टी असावी, तशी दो बाजूंची तटबंदी. पाहाता पाहाता कसे कोण जाणे, दिठीसमोरून हे अवघे हारपले. उरला केवळ कड्याचा बेभान उभार. चंद्रसूर्य प्रकाशतात, तिथवर पोहोचणारा.

रावजीने खांद्यावरचा पंचा अंथरून त्यात मी सोडलेले हंटर बूट बांधून घेतले. बोलला, " निचित असा आप्पानू ! वर पोंचल्यावर देतांय् तुमाला. "

मनात म्हटले, पोचलो वर, तरच्या गोष्टी कशाला करतोस रे रावजी !

हलका वारा सुटला. तो माथ्यावरची पालवी ढाळू लागला. मग म्हणालो, शकुन तर शुभ आहे. अर्धा तास थांबले असू नसू, अन् रावजीनाना उठून बोलला,

" चला आप्पानू ! "

उठलो, अन् इतका वेळ जाणवणारी अपूस थरथर एकदम नाहीशी झाली. गुडघीटोप्या नीट चढवल्या. हवेत तरंगत असल्यासारखा रावजीच्या मागोमाग निघालो. मनी म्हणालो, की कड्या रे, आता तर मी तुझ्या माथ्यावर पाय टेकवणारच आहे !

नागलीच्या शेताचा चढही परीक्षा पाहाणाराच होता. हातभर उंचीवर पाऊल ठेवावे, तर ते दीड हात खाली घसरे. दगड दुगड पायावर आदळत. पण तसाच बेभानपणे जणू रावजीच्या लंगोटीचे शेपूटच धरून चाललो, आणि पाणलोटाच्या डाव्या हातास कड्याच्या ऐन तळाशी जाऊन उभा राहिलो. छातीशी चिकटलेला तो कडा मान वर कलंडवीत न्याहाळला, पण पाऊलखुणांचा पत्ता नाही !

रावजीने कड्यास स्पर्श करून हात भाळावर टेकला, अन् त्याच्या तळाच्या मुरमाटी, ठिसूळ खोबणीत कुठेतरी पाऊल खुपसले. पाठोपाठ मीही त्याच जागी पाय रोवला. रावजीनाना अवघा तोल कड्यावर टाकीत सपासपा घोरपडीवाणी चढू लागला.

कडा चढायचे एक तंत्र आहे. पहिले पाऊल चपखल जमल्याविना दुसरे उचलायचे नाही. हाताला चांगली मजबूत खोबण लाभेपर्यंत शरीर वर पेलायचे नाही. दोन्ही हात आणि दोन्ही पाय, अशी चारी हत्यारे वापरायची. त्या चारीवर शरीराचा भार सारखा द्यायचा. कुण्या एका हातापायावर अंगाचा भार एकारू द्यायचा नाही. दम सांभाळीत चढायचे. घाई करायची नाही. किती चढून आलो ते पाहायचा मोह टाळायचा. दृष्टि स्थिर ठेवायची. ताब्यात असू द्यायची. एकीकडे हातापायांवर शरीर स्थिर करायचे, आणि मग नजर शक्य तितकी वर वळवून वरती धांडोळा घ्यायचा. चाचपडून पाहायचे. मजबूत ठाव लाभताच त्यावर हात गच्च बसवायचा आणि आल्लादपणे कड्याशी अंग घाशीत वर सरकवायचे.

पण हे सगळे पश्चात – शहाणपण ! त्या महत्त्वाच्या क्षणी यातले काहीच जाणवत नव्हते. भवतालचे विश्व हारपले होते. होत्या त्या केवळ रावजीच्या न उमटलेल्या पाऊलखुणा. पुढे तो सरसर वर झेपावतो आहे. त्याच्या पाठोपाठ मी.

त्याचा पाय वर सरताच तिथे हात घालतो आहे. तो गच्च बसवतो आहे. पाची बोटे रोवून कड्याशी अंग घासटतो आहे. वर खेचतो आहे. कधी पायांखालची मुरमाटी सरत्ये आहे. घसरत्ये आहे. पण प्राण पणास लावून कड्याशी जणू एकजीव होतो आहे.

एक क्षण असा येतो, की रावजी दिठीपलीकडे जातो. एकदम समोर अंधारते. पण केवळ पेटून स्वतःला सावरतो. क्षणभराने सगळ्या वृत्ती एकवटून वरचा कडा चाचपीत तीळ तीळ वर सरकतो.

आणि तीन ठिकाणे अशी भेटतात, की केवळ अतर्क्य. वाटते की कोसळलो. झाला चेंदामेंदा. त्याक्षणी कोण स्मरले ?

स्मरली अवघी प्रियजने. स्मरले ते डोळे – जे वाट पाहाताहेत. म्हटले, की निघालो रे गड्यांनो ! रामराम ! आणि मग मन केवळ अंधकूपात बुडाले.

तरी कड्याने काही साथ सोडली नाही. हात चाचपडतच राहिले. आधार सापडताच शरीर सरपटतच राहिले. वाटले, की किती तास चढतो आहे. वाट संपत कशी नाही ?

मधेच रावजीचा शब्द कानी पडला,

" आप्पांनू, हात धरा माजा !"

पण हट्टी मन ! ते म्हणाले, चढेन तर एकटा. कुणाच्या साहाय्याविना !

एका ठिकाणी मात्र कड्यानेच दगा दिला. ज्या दगडावर भरवसून कुडी वर खेचीत होतो, तो असा असोल्या नारळाएवढा दगड एकदम हातीच आला. त्या क्षणी सगळ्या अंगातून घाम धावला. कपाळावरच्या घामाच्या नद्या डोळ्यात शिरल्या. अर्धाच क्षण झांज आली. कसा सावरलो, ते कड्याला ठावके.

तापल्या कड्यावर पायांचे भाजून भरीत झाले होते. पण एक प्रकारची बेहोषी चढली होती. तुटो हे मस्तक. फुटो हे शरीर. पोचायचे आहे कड्याच्या माथ्यावर.

एकदम रावजीनाना थांबला. चमत्कारून त्याला म्हणालो,

" चल ना नाना !"

" झाला सपला आप्पानू ! जिकली हो तुमी ! शेब्बास !

पोहोचलो वर ? कडा संपला ? एवढा तुंग डोंगर चढून आलो ? विश्वास बसेना.

म्हणू गेलो शिवाजी महाराजकी जय. पण कंठ दाटून आला. डोळ्यांच्या काठी पाणी उभे राहिले. पाहिले तर माझा श्री रानफुलांचा गुच्छ घेऊन मजकडे धावत होता. त्या गुच्छाचे मोल कोण्याही सभेतल्या हारतुऱ्यापेक्षा शतपट अधिक होते.

त्याला घट्ट धरले. थोपटले. दरवाजाखाली अतिशय आतुर मनाने, प्राण डोळ्यात आणून माझी वाट पाहात होत्या आक्का, लीना आणि वृंदा. वृंदा लहानगे मूल. तिला झालेला आनंद तिच्या मुद्रेवरून जणू वाहात होता. तिला पोटाशी धरले. एक हात उंचावीत आक्काकडे पाहून हसलो.

मागोमाग तुकशेट अन् रावजी आले. तुकशेट बोलले,

" आप्पा, या वाटेनी वर चढलेला पहिला पांढरपेशा ठावा हाय ?"

मी चमत्कारून पुसले,

" कोण ?"

" त्याचा नांव आप्पा दाण्डेकर !"

रावजीने मान डोलावीत आपल्या पिकल्या उमरीची आण वाहिली. तत्क्षणी म्हटले,

" नाना, तुकशेट, हे कर्तुक तुम्हा दोघांचे. एरवी माझी काय बिशाद !"

तो आक्काने माझ्या हाती दुसरा रानतुरा दिला. तो मी तसाच तुकशेटच्या हाती सोपविला. तो सगळा दिवस धन्यतेच्या पुरात नाहात होतो. पण तिसरे दिवशी हे धन्यतेचे वाहाते पाणी आमच्या जावईबापूंनी खाली बसविले.

ते दिवशी सकाळी मी, जावई विजयराजे, वीणा, धाकुली मू, वृंदा, लीना अशी सगळी पुन: वाद्यदरवाजाखाली पोचलो. तिथून तळात डोकावून म्हटले,

" पाहा, हा कडा चढून आलो परवा !"

अवघ्यांनी डोळे विस्फारून कडा पाहिला. विजयराजे स्तब्ध झाले. पुन: तळात पाहिले, तर तिथे नागलीत रावजी अन् त्याचा तगडा ल्योक विठ्ठल नागली कापीत असलेले दिसले. विठ्ठलला हाकारून म्हटले,

" रे विठ्ठल ! वर येतू का ?"

बोल बोल म्हणता विठ्ठल कडा चढून आला. कधी तो माकडावाणी येंगत असलेला दिसे, कधी खडकाआड दिसेनासा होई. शेवटी अचानक तो आम्हासमोरच उमटला !

जावयाच्या अंगी काय पिसे भरले कुणास कळे ! ते बोलले,

" आप्पा, मी जाऊ का उतरून ?"

मी चमकून वीणाकडे पाहिले. ती म्हणाली,

" जातां ? सांभाळून जाल ? तोल सांवराल ? नेशील ना रे बाबा विठ्ठल ?"

तो हुंकारला,

" हा बी !"

आणि माझा जावई प्राध्यापक विजय प्रल्हाद देव हा येडा मूल विठ्ठल अवकीरकराबरोबर दिनांक सहा नवेंबर, एकुणीसशे एकुणसत्तर रोजी तो आठशे फुटांचा कडा उतरून गेला, आणि पुन: चढून आला.

माझा जावई – त्या वाटेने गडावर पाऊल ठेवलेला दुसरा पांढरपेशा !

सन अठराशे अठरा ते एकुणीसशे एकुणसत्तर या दीडशे वर्षांत त्या वाटेवर धनगरांविना कुणीही पाऊल रोवले नव्हते !

□ □ □

पुरंदऱ्यांची दौलत
पुरंदऱ्यांची नौबत

मूल्य । साडेतीन रुपये
ब. मो. पुरंदरे
राजहंस प्रकाशन

६ डिसेंबर १९६९

# जाणीव !

**जयराम करंबेळकर**

बोरिवली लोकल सुटणार, एवढ्यात कसाबसा फर्स्टक्लासचा डबा पकडला. टाय् सैल केला. नेहमीप्रमाणे सहज सहप्रवाश्यांवर नजर फिरविली. दोन टपोरे डोळे माझ्याकडे रोखून पहात होते. या डोळ्यांची कुठेतरी ओळख आहे असे वाटले. त्या डोळ्यांतही ओळखीचा भाव तरारला.

सफेत वायल चापूनचोपून नेसलेली, पुढे ओढलेली एकच वेणी, वेणीत एकच पांढरे फूल ! ही मुलगी निश्चित माझ्या परिचयाची आहे. पण चटकन् लक्षात काही आले नाही.

"अशोकच ना ?" तिने पुढे होत विचारले. त्या आवाजाने मला खूप खूप मागे नेले. डाव्या हाताने माईक धरून भावगीते म्हणणारी मुलगी झटकन् डोळ्यासमोर आली. नकळत मी मोठ्याने म्हणून गेलो,

"सुधा पालकर !"

ती मनमोकळे हसली. आणखी जवळ सरकली. पण हे सारे अनपेक्षित होते. कारण मला माहित असलेली सुधा महाशिष्ट आणि घमेंडखोर मुलगी होती. तिला हसलेली आम्ही कॉलेजच्या दोन तीन वर्षात कधी पाहिली नाही. तीच का ही सुधा ? आश्चर्य होते. मी बुचकळ्यात पडलो होतो.

"कुठं राहतोस ?"

"विलेपार्ल्याला, ईस्टला ! तू ? तू कुठं असतेस ?"

"गोरेगावला, ईस्टलाच !" ती खळखळून हसली यावर. हे सारे काही मला नवीन होते. परत तिनेच सुरुवात केली.



" नोकरीला कुठे ?"

" नोकरी बिकरी कुछ नही. काही तरी करतो झालं."

" खरंच सांगतोयस नं ?"

" खरंच ! पण तू काय करतेस ?"

' मी लेक्चरर आहे सिद्धार्थला. किती वर्षांनी भेटतो आहोत नाही ? आणि तुझा तो जानीदोस्त घोरपडे कुठं असतो रे ?"

माझ्या डोक्यात प्रश्नचिन्हांची गर्दी झाली. ही मुलगी आम्ही खूप प्रयत्न करूनही कधी आमच्याशी बोलली नाही. आणि आता म्हणतेय, " किती वर्षांनी भेटतो आहोत !'

तिच्या अनपेक्षित मोकळ्या वागणुकीने अवघडून गेलो होतो मी ! त्यात ती घोरपडेची चौकशी करत होती. घोरपडेचे व हिचे प्रकरण तर तेव्हा केवढे गाजले होते ! पण तिला उत्तर तर दिलेच पाहिजे होते.

" मला वाटतं तो बेळगावलाच असतो. म्हणजे तू कधी बेळगावला गेली नाहीस वाटतं ?"

" नाही. जावं असं वाटलं नाही. तुम्हां लोकांना मी बेळगावात पाहिजे होते का ?" मोठे डोळे करत तिने विचारले.

क्षणभरच ती गंभीर झाली. लगेच ती भानावर येऊन हसली. मीही साथ दिली. बोलणे काय आणि कसे सुरू करायचे ते मला समजत नव्हते.

" लग्न केलंस ?" प्रश्न टपकला. नुसताच हसलो मी.

" लाजतोस की काय ?" प्रतिप्रश्न.

" नाही, अजून विचार केला नाही." परत ती गप्प. मीही गप्प.

" काय उकडतंय् नाही ?"

" मुंबईत हे असंच. केव्हाही उकडतं !" इति मी.

" पार्ल्यालाच उतरणार आहेस ना ?" असे तिने विचारल्यावर मी चटकन् बाहेर पाहिले, आणि चटकन् उतरून गेलो. गाडी सुरू झाल्यावर लक्षात आले की आपण तिचा पत्ता विचारलाच नाही. म्हणजे ही भेट अशीच, कुणाचीही होते तशी. पाठमोऱ्या गाडीकडे, अंधेरी स्टेशनात ती पोचेपर्यंत पहात राहिलो. सुधाचे टपोरे डोळे डोळ्यांपुढून हलेनात !

सुधाचे डोळे ! मला ते टपोरे डोळे खूप आवडायचे. तिच्या या डोळ्यांमुळे कॉलेजमध्ये तिला 'बेडूक' म्हणून चिडवीत. साऱ्यांबरोबर अर्थात मीही त्या टवाळीत भाग घेत असे. पण खरा पुढाकार घेत असे तो घोरपडे. ती कधी हसलेली आम्ही पाहिली नाही. कुणाशी कधी बोलली नाही. शिष्ट, घमेंडखोर ! घोरपडे तर सारखा म्हणायचा हिची खोड एकदा जिरवली पाहिजे !

त्यानंतर घोरपडेने केलेला तो पराक्रम ! गॅदरिंगचा दिवस होता तो. घोरपडे तिच्या पाळतीवरच होता. ती सायन्स बिल्डिंगकडे एकटी होती. जिन्यावरून ती खाली उतरत असताना हा वर जाण्याचे निमित्त करून गेला, व एकदम सुधाला मिठीत घेण्याचा त्याने प्रयत्न केला. तिचे चुंबन घेण्याचा त्याने प्रयत्न केला. सुधाने मोठ्या मुष्किलीने सुटका करून घेतली. काही क्षणातच प्रकरण प्रिन्सीपॉलकडे गेले. कॉलेजभर झाले. बेळगावभर झाले ! घोरपडेला कॉलेजमधून काढून टाकण्यात आले.

घोरपडे मात्र सुधाची मस्ती जिरवल्याची शेखी मारत हिंडत होता. कॉलेजच्या दरवाजाशी हा घोटाळे. आम्हांला चहा पाजून सुधाविषयी नेहमी नव्या गोष्टी सांगे. सुधा आपल्या बहिणीकडे रहात होती. घोरपडेने बातमी आणली की सुधाचे बहिणीच्या नवऱ्याबरोबरच लफडे आहे. ही बातमी आम्ही व्यवस्थित सगळीकडे पसरवली. सुधाला त्याच्यापासून दिवस गेलेत ही घोरपडेची दुसरी बातमी. तीही पसरली. एक दिवस सुधा कॉलेजला आली नाही ! घोरपडेने बातमी आणली सुधा हॉस्पिटलमध्ये आहे, लफडे मिटवण्याकरता ! त्यानंतर सुधा कधीच दिसली नाही !

त्यानंतर भेटली ती ही आज ! अचानक ! पण पूर्वीची सुधा बदलून गेली होती. म्हणूनच मला उत्सुकता होती. पण कुणास ठाऊक ती परत भेटेल की नाही ?

...अशीच अचानक ती मला 'एरॉस'ला भेटली. तिकीटाकरता मी रांगेत उभा होतो. पण मला तिने बाहेर काढले. कुठेतरी भटकू असे म्हणाली. तिनं आपणहून माझा पत्ता घेतला व आपला मला दिला.

अशीच एक दिवस ती घरी आली. आत शिरताच, " काय रे घराचा उकिरडा करून ठेवलायस् ?" म्हणून ओरडली, जणू काही असे रागवायचा तिला अधिकार

आहे. बेधडक आतल्या खोलीत शिरली, " ही खोली म्हणजे गोडाऊनच दिसतंय्?" मग तिला सगळे सांगितले. "प्रथम गंमत म्हणून एका मित्राच्या ओळखीने चोरटी घड्याळे व लायटर्स विकू लागलो. नंतर टेपरेकॉर्डर्स, ट्रॅन्झिस्टर्स विकू लागलो. आता यातनं सुटता येणं शक्य नाही. पैसा खूप मिळतो पण रिस्कही खूप!" तिला याचं फारसं काही वाटलेलं दिसलं नाही.

मग ती वरचेवर येऊ लागली. आली की घराचा ताबा घेई. तिने मोकळे-पणाने सर्व हकीगत मला सांगितली. घोरपडे प्रकरणानंतर तिच्या वहिणीने तिला हाकलले. मेव्हणा खवळला होता. आईचा विश्वास उडाला होता. तिचे लग्न ठरवण्याचे प्रयत्न झाले. ती चटकन् पसंत पडे. पण पुढे काय घडे कळत नसे. पण लग्न मोडत असे. तिचे लग्न कुठे जुळत आले की तिचा मेव्हणा त्या मंडळींना सुधाविषयी वाईट साईट लिहून कळवी. एक गृहस्थ सरळसरळ पत्र घेऊन आल्यावरच हे कळले. तिचा मेव्हणा तिच्यामुळे बदनाम झाला होता. त्याची तो परतफेड करीत होता! मग ती मुंबईला मावशीकडे आली व पुढील शिक्षण पुरे केले.

सुधा वारंवार भेटू लागली खरी, पण पेचात पडलो होतो मी. सुधा मला मना-पासून आवडत होती. पण लग्नाचे तिला विचारण्याचा काही मला धीर होत नसे. का कोणास ठाऊक, पण मला तिची भीती वाटत असे. तिच्या बेधडक मन-मोकळेपणाचा मोह पडे. पण मर्यादा ओलांडावी असे कधी वाटली नाही. सुधा


# इझिडेन्ट

लहान मुलांना दात सुलभ रीतीने येण्यास मदत करते.

ताप, जुलाब, सर्दी वगैरे कोणताही त्रास होत नाही.

प्रतिबंधक म्हणून चौथ्या महिन्यातच सुरू करा.

उत्पादक :

**न्यू इरा**
**होमिओपॅथिक फार्मसी**

दादर रेल्वे स्टेशनसमोर (पश्चिम) मुंबई – २८.

**एजन्सी नसलेल्या गावी एजन्टस् नेमणे आहेत.**

नसली की तिच्याविषयी सारखे विचार येत आणि तिच्याशिवाय आपले होऊच शकणार नाही असे वाटायचे. पण ती आली की मी काही बोलू शकत नसे. सुधाच्या या भेटीगाठींना आता काहीतरी अर्थ देणे प्राप्त होते, पण मी गोंधळलो होतो व काहीच सुचत नव्हते.

पण यातून सुधानेच माझी सोडवणूक केली. एक दिवस नेहमीप्रमाणेच बेधडक ती आली. माझ्यासमोर खुर्ची ओढून घेत तिने विचारले.

"मी तुला काय विचारणार असेन सांग बघू ? " म्हणजे आली पंचाईत. हिच्या मनचा प्रश्न मी कसा सांगू ? मी गोंधळून बावळटपणे तिच्याकडे पहात राहिलो.

"माझ्याशी लग्न करशील ? " डोळे रोखून तिने विचारले. "हे बघ तुला विचार करायला मला चहा करायला जेवढा वेळ लागेल तेवढाच मिळेल समजलं ?" ती पुढे म्हणाली. तडक ती आत गेली. पुरा हॅम्लेट झाला होता माझा. काही झाले तरी मन नकाराकडे जास्त झुकत होते. एवढेच की हे तिला कसे सांगायचे ? कारण काय सांगायचे ? कारण माझ्या नकाराला कारण काय होते ? एवढे खरे की होकार द्यावा असे वाटत नव्हते, सुधा मनापासून आवडत असूनही.

एवढ्यात ती चहाचे कप घेऊन आली. चहाचा काप माझ्याकडे देत ती म्हणाली.

'हं बोल, काय ठरवलंयस तू ? "

"सुधा माफ कर, पण...पण मी लग्न करू शकत नाही !" आवंढा गिळीत मी सांगितले.

"मी आपणहून विचारले, म्हणून कारे भाव चढला हा ? "

"तसं नाही ग, पण माझा हा असा चोरटा व्यवसाय ! माझ्यामुळं तुझं नुकसान व्हावं असं मला वाटत नाही "

"हे सगळं मी तुला विचारलंय का ? तू नाही म्हणालास यात सगळं काही आलं !" क्षणभरच तिच्या डोळ्यात गंभीरपणा दिसला. पण क्षणभरच. मी मात्र विचारहीन होऊन बसलो होतो. लगेच ती म्हणाली.

"आता असाच आळसटल्यासारखा बसणार आहेस की..." मी तिचा विचार ओळखला, आणि मी तिच्याबरोबर बाहेर पडण्याचे ठरवले. तिच्या संयमी आणि समतोल वागण्याचे आश्चर्य व कौतुकच वाटले. सांताक्रूझ विमानतळापर्यंत आम्ही चालतच गेलो. ती नेहमीसारखीच मोकळेपणी बोलत होती. पण मी अवघडून गेलो होतो. हिला हे कसे साधते ? मध्येच एका जाणाऱ्या गृहस्थाकडे हात दाखवीत ती म्हणाली, " हा तुझ्या त्या घोरपडेसारखा दिसतो नाही ? " हिला असा अधून-मधून घोरपडे का आठवावा ? तिथून तिचा निरोप घेतल्यावर मी सुधाला विसरायचा प्रयत्न केला. त्यात बराचसा यशस्वी झालोही.

खरे म्हणजे त्या प्रसंगानंतर ती कधी मला भेटेल असे वाटले नव्हते. पण ती एकदोनदा मला भेटून गेली. पण ते काही खरे नव्हते. आणि तिच्या भेटीने मी उगाचच अपराधी वाटत होतो.

त्यानंतर तिच्याविषयी वाटेल ते उलटसुलट ऐकू येत असे. ती कुणाबरोबरही भटकते, तिच्या घरी तिच्याच कॉलेजमधला विद्यार्थी रहातो. तो तिचा नवरा आहे अशी ती सगळ्यांना सांगते. तिच्या कॉलेजमधल्या काही प्रोफेसरांचा नि तिचा वाईट संबंध आहे म्हणे ! हे सारे ऐकून आत खोलवर दुःख होत होते. पण 'तू हे असं का करतेस ?' असे विचारायचा मला अधिकार मी ठेऊ दिला नव्हता व ते धैर्य का कुणास ठाऊक मला होत नव्हते. हे ऐकून वाईट वाटण्यापलीकडे मी काहीच करू शकत नव्हतो.

अधूनमधून तिच्या टपोऱ्या डोळ्यांची आठवण होत असे. पण खळबळ कधीच उडाली नाही.

असे असतानाच एक दिवस नेहमीच्याच बेधडकपणे ती आली. पण खूप रोडावलेली दिसली मला ती. शुष्कपणे पण कठोरपणे ती मला म्हणाली,

"तू खोटं बोललास माझ्याशी !"

"काय खोटं बोललो मी ?"

"घोरपडे बेळगावला नाही. तो गोव्याला आहे व हे तुला ठाऊक असूनही तू मला सांगितलं नाहीस ! का ? का खोटं बोललास ?"

"कमाल आहे तुझी सुधा. मला वाटलं नव्हतं तू त्याची एवढ्या उत्सुकतेने चौकशी करशील. ज्याला घोरपडे माहीत आहे, तो तर मुळीच करणार नाही !"

"घोरपडेची चौकशी मी का केली तेच सांगायला तर आलेय्. पण आधी मला थोडा चहा करून दे. आज मी करणार नाही आहे. जरा स्ट्राँगच कर !' आणि ती बराचवेळ थंड बसली. तिच्या रोडावलेल्या देहामुळे तिचे मोठे डोळे खरोखरच बटबटीत दिसत होते, आणि 'बेडूक' हे नाव आता तिला सार्थ शोभत होते. चहा भसाभसा तिने घशाखाली घातला. आणि उगाच एका कोपऱ्यात टक लावून पहात राहिली. मला ही शांतता सहन होईना.

"सुधा तू गप्प का ? घोरपडेबद्दल मी खोटं बोललो म्हणून रागावलीस ?"

"नाही. रागावले नाही, वाईट वाटलं. मनाची अटकळ खोटी ठरली त्याबद्दल वाईट वाटलं ! माझ्या आयुष्यात घडलेल्या त्या एका प्रसंगानंतर माझ्या काही कल्पना निश्चित झाल्या. पुरुष कसा असावा, ते घोरपडेनं मला दाखवून दिलं होतं. आणि मी अशा पुरुषाला भेटायला आसुसले होते. वेडावले होते. पुरुष असा बेधडकच वागला पाहिजे असं मला वाटतं !"

"असाच सहज तू भेटलास, तुझं देखणं, भरदार व्यक्तिमत्त्व पाहून मी भारावले. मी मनात नुसत्या कल्पना करीतच राहिले. आणि नुसती वाट पहात राहिले."


"तू मला लग्नाला नकार दिलास पळपुटेपणामुळं ? बघतोस काय असा ? तूं नुसता शरीराने पुरुष आहेस ! खरं सांग. मनापासन सांग, मी तुला आवडले की नाही ? मी आपणहून तुला लग्नाचं विचारलं होतं की नाही ? तुला तसं वाटत

# फॉस्फोमिन -

# अधिक उत्साह देते. भूक वाढविते. जोम वृद्धिंगत करते. शरीराची रोग-प्रतिकार-क्षमता वाढविते.



खरोखर!...
फॉस्फोमिन म्हणजे
घरकुलांतील
आरोग्याचे कारंजे!




व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि विविध ग्लिसरोफॉस्फेटस्युक्त उत्तम फलास्वाद असलेले हिरव्या रंगाचें टॉनिक—फॉस्फोमिन

SQUIBB TTT ® हा ई. आर. स्क्विब ॲण्ड सन्स इन्कॉर्पोरेटेड यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे व करमचन्द प्रेमचन्द प्रायवेट लि. यांना तो वापरण्याचे लायसन्स आहे

SARABHAI CHEMICALS

Shilpi SC 50A/67 Mar

होतं की नाही ? मग मनचं मनातच का ठेवलंस ? एवढं साधं धाडस तुला करता आलं नाही ? का स्वतःचं मन मारलंस ?"

मी तिला मध्येच अडवायचा प्रयत्न केला. पण व्यर्थ.

"आज मी आलेय् ते सारं सांगण्याकरता. तुझी लायकी तुला सांगायला ! मध्येच आडवू नकोस. मी सर्वांच्याकडे फिर फिर फिरले. पण माझ्या आयुष्यात तुम्ही आलेले सारे लोक पुळचट भित्रे. नुसत्या चोरट्या स्पर्शानं समाधान मानणारे ! मनात येणारं प्रत्यक्षात करू न शकणारे भ्याड ! सारे विकृत मनाचे ! पुरुष कोणीच नाही !

"माझ्याविषयी तू खूप ऐकलं असशील नाही ? पण मी आज साऱ्यांविषयी सांगतेय्. माझे सहकारी प्रोफेसर, काय पण एक एक लोक ? नुसतं त्यांना बसमध्ये, लोकलमध्ये चोरून, पण नकळतच घडलाय असं दाखवून स्पर्श करणं यातच समाधान मानणारे ! खुरटे, रोगट !

"माझा एक विद्यार्थी दररोज घरी यायचा. डिफिकल्टीज् विचारायचा. आणि हाकलून लावेपर्यंत जायचा नाही. मला किती दिवस काही त्याची वागणूक समजेचना. मनात आलं हा भावना बोलायला घाबरतोय. मी त्याला एक दिवस खरंच घरी जाऊ दिलं नाही. त्यानं आपणहूनच त्या दिवशी मला लग्नाचं विचारलं. मी बेधडक हो म्हटलं ! रात्री झोपला तो आईच्या कुशीत मूल झोपतं तसा ! मला पाहिजे होता पुरुष ! मिळालं हे कोकरू !"

"माझं गणितच चुकलं आयुष्यात ! तुम्ही सगळेच असे भेकड, अप्रामाणिक भेटलात...."

"...म्हणूनच मला सारखी घोरपडेची आठवण येते. माझ्या आयुष्यात तोच एक प्रामाणिक पुरुष आला. त्याला जे काही वाटलं ते त्यानं करून टाकलं. खरं सांगू, त्याला दुखवल्याबद्दल मला खूप वाईट वाटतंय्. मला चुटपुट लागून राहिलीय्, म्हणूनच मला त्याला भेटायचंय् ! कोणास ठाऊक तो आता माझ्याशी कसा वागेल ? पण माझ्या मनच्या आदर्श पुरुषाला मी भेटणारच ! माझ्यासारख्या घमेंडखोर मुलीबरोबर जसं वागायला पाहिजे तसंच तो वागला होता. त्याला दुसरा मार्गच नव्हता ! आणि तू ? इतक्यांदा मी तुझ्याकडे आले, मनातनं कल्पना घेऊन आले की तू मला झडप घालून आपल्या ताब्यात घेशील ! कवटाळशील ! हं, काय बोलून उपयोग ? तू ते कधी करूच शकला नाहीस, शकणार नाहीस !"

"म्हणूनच मी जातेय्...त्याला भेटायला... क्षणभर ती थांबली. आणि बेधडक नेहमीसारखीच निघाली ती. वळणावर पोचली. नेहमीसारखा टाटा तिनं केला नाही. मी भारावून तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात राहिलो. मनानं मी तिच्यामागोमाग गेलो. तिला मिठीत घेतलं. पण शरीर ? मी एका जागी खिळलेला होतो ! सुधा म्हणाली ते खरं होतं ! मी पुळचट होतो ! पुळचट आहे !! पुरुष नाही !!!

□ □ □

# एक
# आवाज
# बाकी
# बकि

## २३ मे — १९६६

" **सा**ब, चाय " कुंदनसिंग तंबूच्या दारातून ओरडतो. मी अर्धवट जागाच आहे. सकाळच्या थंडीत झोपण्याच्या पिशवीच्या उबेत मजेत लोळत आहे. तसाच बसून माझा ' मग ' मी दारातून बाहेर करतो व चहा घेतो. आता खरोखर आमच्या मोहिमेचे जीवन सुरू झाले. सकाळी चहा घेऊनच अंथरुणाबाहेर यायचे. याच्यापुढे तोंड धुणे बंदच. उंचीवर गेल्यावर सकाळी उठल्यावर दात घासण्याची फारशी आवश्यकता नसते. स्नानसुद्धा नाही. आहेत तेच कपडे घालून झोपायचे व तसेच फक्त बूट घालून बाहेर पडायचे.

मी तंबूच्या बाहेर येतो. उगवत्या सूर्याच्या कोमल किरणात सोनेरी बर्फाच्छादित शिखरे चकाकत आहेत. आज आम्ही ८ वाजता निघणार आहोत. सकाळच्या न्याहारीला आज पण बिस्कीटेच. ह्या बिस्कीटांचा प्रश्नच आहे. बरीचशी खाली ठेवूनसुद्धा आमच्याबरोबर फारच झाली आहेत. ती संपण्याची आशा नाही.

बरोबर ८ वाजता आम्ही निघतो. अरोरा माझ्याबरोबर आहे. आमच्या समोरच एक टेपाड आहे. प्रथम ते चढून जावयाचे आहे. आमच्या पाठीवर आज रकसॅक नाही. त्यामुळे बरे वाटते. आम्ही त्या टेपाडाच्या माथ्यावर पोहोचतो. लता शिखरात संपणारी पर्वताची भिंत आमच्या समोरच आहे. आमच्या थोडी खाली



दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेल्या
हिमालयीन साहसकथेचा
दुसरा भाग

लेखक : आनन्द चांदेकर

ती दिसते. लता शिखरसुद्धा आमच्या जरा खालीच असावेसे वाटते. त्या भिंतीच्या पलीकडे ऋषिगंगेची दरी व कालपासून दिसत असलेली बथारटोली हिमाल, रोंती वगैरे शिखरे. मला आमच्या सह्याद्रीतील हाईक्सची आठवण होते. बथारटोलीच्या डाव्या बाजूस दोन नवी शिखरे दिसू लागली आहेत. मघाशी धुक्यात होती. आता स्पष्ट दिसतात. फारच सुंदर. पण कोणती आहेत ती ! आम्ही विचार करू लागतो. त्रिशूळ ! आम्ही नकाशा, होकायंत्र वगैरे सामान काढतो. आता नक्की समजेल. अरे ही तर देवीस्थान–एक व दोन–मजा आहे. या छोटयाशा संशोधनाचा आम्हाला अभिमान वाटतो. आम्ही भराभर फोटो घेऊ लागतो. "हे ऽ घरत, all the best" डॉक्टरांची आरोळी येते. आमचे सर्व सदस्य येथे पोहोचले आहेत.

खूप छायाचित्रे टिपल्यानंतर आम्ही निघतो. समोरील डोंगर ओलांडून आम्हाला पलीकडे जावयाचे आहे. जवळजवळ १३००० फुटांवर आम्ही असू. आता थोडे थोडे बर्फ लागू लागले. आम्हाला काही ठिकाणी बर्फातून जावे लागते. येथे पायवाट आहे–धनगरांची. मी सर्वांच्या पुढे आहे. आता प्रथमच बर्फातून जावयाचे आहे. मी बर्फावर चालतो, एक दोन तीन पावले टाकतो. आणि हे काय ? मी बर्फावरून गडबडत खाली जात आहे. हातातील बर्फाची कुऱ्हाड कुठे उडाली, पाय केव्हा घसरला ते समजले पण नाही. आता बर्फ संपले. झुडपांवरून व गवतावरून गडबडत जात आहे. सारखा वेग वाढत आहे. आता काय करावे ? ही घसरगुंडी थांबलीच पाहिजे, नाही तर ! मी विचार करतो. ही संधी आली. पालथा झाल्याबरोबर खालची झुडपे व गवत हातात आले ते घट्ट धरले. दोन चार हातातच आली, पण थांबलो. मी उभा रहातो व हसतो. सर्व शरीराची पहाणी करतो. फक्त थोडे खरचटले आहे. बाकी काही नाही. चांगलीच Warning मिळाली.

मी घसरलो ते फक्त अरोरानेच पाहिले. तो माझ्या मागेच होता. "चांदेकरसाब, चांदेकरसाब, म्हणून ओरडत होता. लोपसांग एवढ्यात येऊन पोहोचला होता. त्याने मला गडबडत जाताना पाहिले होते. इतरांना काय झाले ते समजले पण नाही.

मी वर चढून पुन्हा पायवाटेवर येतो. फक्त ५० फूटच खाली गेलो होतो. सर्वजण माझ्या भोवती जमतात. सर्वांच्या चेहऱ्यावर काळजी. बर्फावरून जाताना किती काळजीपूर्वक जावयास पाहिजे याची चांगलीच कल्पना आली. थोडीशी कुचराई केली तर अपघात–म्हणजे काहीही होईल.

आम्ही डोंगर ओलांडून पलीकडील उतारावर येतो. समोर एक खोल दरी, पलीकडील बाजूस खडकाळ पर्वत व शिखरे— काही ठिकाणी बर्फ. पलीकडे दूर अंतरावर बर्फाच्छादित शिखरे दिसतात. हा हिमालय आहे. त्याची प्रचंडता जाणवते. अंतराचा व उंचीचा अदमासच करता येत नाही. येथले परिमाणच वेगळे आहे.

आता बराच बर्फ ओलांडावा लागणार आहे. आम्ही फार काळजीपूर्वक चालतो. लोपसांग सर्वांच्या पुढे आहे. बर्फामध्ये चालण्याच्या त्याच्या जड बुटांनी तो वाट

करीत जात आहे. आम्ही त्या वाटेने जातो. आमचे अगदी हलके हंटरबूट बर्फावर निरुपयोगी ठरले. आता तर फारच जपून जावयास हवे. जर कोणी घसरला तर थेट खाली. मधे मधे खडक वर आलेले आहेत, त्यांच्यावर आपटून मोक्षच मिळायचा. नुसत्या कल्पनेनेच अंगावर शहारे येतात.

समोर आमच्या उजव्या बाजूला धराशीचे काळेकभिन्न सुळके निळ्या आकाशात उठून दिसतात. ही सबंध बाजू काळ्या खडकांची आहे. मधे मधे बर्फाचे पांढरे शुभ्र पट्टे दिसतात. लांबून ते लहान वाटतात. पण जवळ गेल्यावर लांबच्या लांब पसरलेले आढळतात. डाव्या बाजूला द्रोणगिरी दिसत आहे. आमचा हनुमान मात्र दिसत नाही. तो धराशीच्या सुळक्यांमागे लपला आहे.


पावणे अकरा वाजले आहेत. "देसाई किती उंचीवर आहोत आपण?" मी देसाईंना विचारतो. त्यांच्याजवळ आमचे उंचीमापक यंत्र आहे. "जवळजवळ १३५०० फूट," ते उत्तर देतात. म्हणजे दुराशी खिंड अजून आमच्यापेक्षा ५०० फूट उंच आहे. आम्हाला समोरच्या डोंगरात ३ खाचा दिसतात. त्यातलीच एक ती खिंड आहे. पण कोणती ते येथून नक्की सांगता येत नाही.

जोशी-मठला आल्यापासून व्यंकी जरा गप्पच आह. फारसा बोलत नाही. हसत-खेळत वागणे पण नाही. काय झाले आहे कोणास ठाऊक? कदाचित् उंचीचा परिणाम असेल. अरोरा त्याच्या नेहमीच्या मूडप्रमाणे गंभीर आहे. डॉक्टर व घरत मजेत आहेत. डॉक्टर सारखे सर्वांना हसवीत असतात. प्रकाश आमच्यातील सर्वात तरुण. प्रथमच हिमालयात आलेला. उत्सुकतेने सर्व पहात आहे. माझ्या मनात मात्र धाकधूक आहे. सकाळी घसरल्यापासून आम्हांला फार जपून राहिले पाहिजे. देसाई त्यांच्या नेहमीच्या मूडमध्ये आहेत.

आता जास्त पुढे जाणे जरुर नाही. वेळ पण बराच झालेला आहे. लवकर कॅम्प-मध्ये परत गेले पाहिजे. माळींचा निरोप काय येतो व ते केव्हा येतात याच्यावर पुढील कार्यक्रम ठरेल. आम्ही जरा बसून परत फिरावे असा विचार करतो. सर्वांच्या खिशात बिस्कीटे आहेतच. शिवाय चीजचा डबा पण आम्ही आणला आहे. तो चटकन संपतो. पाणी— बाटलीतले. येथे आसपास बर्फ असले तरी—आमच्या-भोवती सर्व बर्फच होते. प्यायला पाणी नाही. बर्फ उन्हाने वितळते, पण ते पाणी जमीनीतच जिरते अगर बर्फाखालून वहाते.

आमच्या समोरच्याच खडकावर एक उंदीर आहे. करड्या रंगाचा व बिन शेपटीचा, छोट्याशा सशासारखा दिसतो. आम्ही त्याला थोडे चीज टाकतो. पटकन ते घेऊन तो पळतो. पण शेपटी नसल्याने त्याच्या हालचाली गमतीदार वाटतात.

ओवळेकरांना चीज फार आवडते. ते जरा हळू चालतात; पण त्यामुळेच की काय लवकर थकत नाहीत. त्यांची पण प्रकाशप्रमाणेच हिमालयाला पहिलीच भेट. ते पण येथील वातावरणाला चांगलेच सरावले आहेत.




A लता. B लता खडक. C. दुराशी खिंड. D दुराशी अल्प. E मालाथुनी खिंड. F. दिब्रुघेटा. G. देवडी.
B. C. बेस कॅंप. C. 1. कॅंप 1. C. H. छोटा हनुमान.

आम्ही परत फिरतो. येताना मजेत गप्पा मारीत व आसपासच्या सौंदर्याचा आस्वाद घेत; पण काळजीपूर्वक पावले टाकीत येतो. दुपारी १२ वाजता कॅम्पमध्ये परत आलो.

" Sir, from tomorrow you will use climbing boots." लोपसांग म्हणतो. " That will reduce our load. It will be good practice and safer." आमच्या अनुभवावरून आम्हाला त्याचे म्हणणे तावडतोव पटते. लागलीच बुटांची वाटणी होते. प्रत्येकजण आपल्या पायाच्या मापाचा बूट शोधून घेतो. प्रकाशचा पाय सर्वात मोठा आहे. त्याच्या पायाला कोणताच बूट येत नाही. आम्ही रूसी गांधींकडून विकत घेतलेला Shining boot त्याला वापरावा लागणार. बुटावरोवर प्रत्येकाला एकेक Wind proof coat पण देण्यात येतो. ह्या नायलॉनच्या कोटाने पावसापासून व वाऱ्यापासून उत्तम संरक्षण होते. शिवाय त्याला अर्धा डझन तरी खिसे असतात; बाजूला, समोर, खाली असे. बऱ्याच वस्तू – कॅमेरा, चष्मा, खाण्याचे जिन्नस, सिगारेटस्, काड्याची पेटी, हातमोजे, रुमाल, वगैरे निरनिराळ्या खिशात भरता येतात. मला सर्वात उत्तम – एक गर्द हिरवा कोट मिळतो.

जेवणापूर्वी आम्ही चहा घेत बसलो आहोत. हिमालयात चहा केव्हाही चालतो. येथील हवाच अशी असते की गरम पेय केव्हाही उत्तम. एवढ्यात थानसिंग येतो. त्याला माळींकडील बातमी काढावयास पाठविले होते. माळींनी चिठी पाठविली आहे, " No more porters available. I am comming up today." म्हणजे आहेत त्या ३० हमालांवरच आम्हाला अवलंबून रहावे लागणार. अजून आमचे १३ बोजे खाली राहिले आहेत. ते सर्व वर आणलेच पाहिजेत. आता प्रत्येक वेळेला थोडे सामान ठेवून पुढच्या तळावर जाणे व नंतर ते सामान आणवणे याशिवाय मार्ग नाही. तावडतोब आम्ही १३ हमाल खाली पाठवले. ते उद्या सर्व सामान घेऊन वर येतील. आम्हाला आणखी एक दिवस येथेच काढावा लागणार. बाकीचे १५–१६ हमाल एक दिवस स्वस्थ वसून रहाणार. " पण त्यांना काही सामान दुराशी खिड ओलांडून पुढच्या कॅम्पवर पोहोचवून उद्याच्या उद्या येता नाही का येणार ?" कोणी तरी सुचविले. लोपसांगला ही कल्पना एकदम पटते. " Sir, I and Dorje will go with them. This must be done." तो म्हणतो. सर्वांनाच ती कल्पना पटते व तसेच करायचे ठरते.

आमच्या तंबूंपैकी एक तंबू मोठा आहे. त्याच्यात तीन माणसे व्यवस्थितपणे सामानासह राहू शकतात. आम्ही सर्वजण बराच वेळ या तंबूतच बसतो. सर्वजण आत कोंबून बसतो. त्या तंबूला आम्ही आमचा Conference tent म्हणजे बैठकीचा तंबू म्हणतो. आता जेवण करून आम्ही तेथे बसलो आहोत. येथे असलेले सर्व सदस्य आहेत. दुपारचे २ वाजले असावेत. इतक्यात " डॉ. साव, all the best " अशी घरतची आरोळी येते. माळी व घरत येऊन पोहोचले आहेत.

ते सरळ तंबूत येतात. आम्ही ओरडून बहादूरसिंगला त्यांचे जेवण उरकण्यास सांगतो. नंतर आमची चर्चा सुरू होते. मी माळींना आमची योजना सांगतो. उद्या जर काही सामान पुढील कॅम्पवर गेले व खालील १३ बोजे वर आले तर परवाच्या दिवशी आम्ही सर्व सामानासह दुराशी खिंड ओलांडून पलीकडील तळावर पोहोचू. पण उद्याच्या उद्या ती खिंड ओलांडून पलीकडील तळावर सामान ठेवून हमाल परत येथे येऊ शकतील का, हा प्रश्न होता. त्यांनाच विचारले पाहिजे. जयसिंगला बोलावणे जाते. तो येतो. प्रत्येकाला हात जोडून स्वतंत्र नमस्कार. आम्ही त्याला आमची कल्पना सांगतो. त्याला इतरांचा सल्ला घेतला पाहिजे. तो जातो व थोड्या वेळाने परत येतो. पुन्हा प्रत्येकाला नमस्कार. त्याच्या बरोबर कुंदनसिंगचा बाप, लतागावचा भीमसिंगही आहे. "साब, लोगोंकी तकलीफ देखकर ोर्टर ये करेंगे; लेकीन बोजा जरा कमती करना पडेगा" तो म्हणतो. "सरकार, हम आपके लिये जायेंगे क्यो नही ? हम आपके लिये कुच्छ भी तकलीफ उठायेंगे. आखीर पोर्टरोंको भी जादा पैसा मिलेगा" – भीमसिंग म्हणतो. मोठ्या हुशारीने तो जादा पैशाचे घोडे पुढे दामटतो. पण त्याचे बरोबर आहे. म्हातारा मोठा चिवट आहे. रुबाबदार दिसतो. तरुणाइतकाच मोठा बोजा तो पण उचलतो.

निर्णय घेतल्यावर आम्ही ताबडतोब कामास लागलो. उद्यासाठी योग्य बोजे करावयाचे होते. माळी जरी नुकतेच वर आले होते तरी ते कामास लागले. मीरवानसिंग व भीमसिंग प्रत्येक बोजाचे वजन करीत होते. कोणताही बोजा २४ किलोपेक्षा जास्त असू नये असे ठरले होते. फक्त औषधांच्या पेटीचे वजन २८ किलो होते. ते कमी करणे शक्य नव्हते. ती पेटी मीरवानसिंग स्वत: उचलणार होता. त्याशिवाय आणखी १५ बोजे आम्ही तयार केले.

एवढ्या सगळ्या गडबडीत घरत कुठे तरी गडप. त्यांचा वेगळाच उद्योग चालला होता. आमच्या सर्व हमालांनी मिळून रस्त्यात भेटलेल्या धनगराजवळून एक मेंढी घेऊन आज कापली. त्यातला कलेजा व मांस घरतांनी आमच्यासाठी मिळविले. याच उद्योगात ते गढले होते. संध्याकाळच्या जेवणासाठी कलेजा करण्याच्या कामाला पण ते लागले. मांस उद्यासाठी. या ठिकाणी हवा इतकी थंड आहे की, ते मुळीच खराब होणार नाही. फ्रीजमध्ये ठेवल्याप्रमाणे सर्व खाण्याचे पदार्थ खराब न होता दिवसेंदिवस टिकतात.

आम्ही सर्व चुलीभोवती बसून घरतांचे काम पहात आहोत. मला काहीच स्वयंपाक येत नाही. प्रकाश एक मांसाचा तुकडा काडीला लावून विस्तवावर भाजतो. मी त्याची चव पहातो. फारच चविष्ट लागतो. मग सर्वांनाच एकेक तुकडा भाजून हवा असतो. बिचारा व्यंकी मात्र बाजूला बसून पहात आहे. तो पूर्णपणे शाकाहारी आहे. आज दोरजेने स्वयंपाकाचा चार्ज घेतला आहे. बहादूरसिंग त्याच्या हाताखाली काम करीत आहे.

एक हमाल वर येतो. त्याने आपल्या पांघरूणात सामान बांधून आणले आहे मीरखानसिंगने काल वर येताना रस्त्यातच ठेवलेला सिगारेटचा खोका आणण्यास, ह्या हमालाला पाठविले होते. तो आता आला. येताना रस्त्यात त्याच्या हातून तो खोका पडला, व पूर्णपणे मोडला. आतल्या सिगारेटस् इतस्ततः विखुरल्या. पण बिचाऱ्याने सर्व सिगारेटस्च्या पेटचा गोळा केल्या, एवढेच नाही तर ते खोक्याचे तुकडे पण आपल्या पांघरूणात बांधून वर आणले. मोजून पाहिले तर एक सुद्धा सिगारेट कमी झाली नव्हती. खरोखर हे लोक फार प्रामाणिक आहेत.

“ काय Q. M., what is the position of rice and atta ?” मी ओवळेकरांना विचारले. पुढे हा रोजचा प्रश्न झाला. ते म्हणाले, “ सध्याच्या प्रमाणात हमालांना द्यावे लागले तर जेमतेम बेस कॅम्पपर्यंत पुरतील.” म्हणजे पुन्हा दोन हमाल पाठवून आणखी शिधा आणावयास हवा. आता जे दोघे जातील ते नंतर आम्हाला एकदम base camp वरच भेटतील. मुवैंचा तगडा जवान थानसिंग याच्याकडे ते काम देण्यात आले. तो सर्वांनाच त्याच्या रेखीव व्यक्तिमत्त्वाने आवडू लागला आहे.

संध्याकाळी व्यकी व प्रकाश रेडिओ घेऊन बसले होते. व्यंकीच्या म्हणण्याप्रमाणे सेंट स्टीफन कॉलेजच्या मोहीमेसाठी एक हवामान वृत्त रेडिओवर येणार आहे—साधारणतः याच वेळेला (५:३०)—एकदम आनंदाची आरोळी येते. ते दोघे रेडिओ घेऊन तंबूत धावत येतात. “ Here is a special weather bulletin for the St. Stefhens' College expedition ” आम्ही ते ऐकतो. देसाई लागलीच टिपणे करतात. नंतर आणखी एक हवामान वृत्त Indian Kumaon expedition साठी. आमचे मात्र नाव येत नाही. आम्हाला मोहिमे-

लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध !

डोंगरे बालामृत

के. टी. डोंगरे अॅण्ड कं. प्रा. लि. मुंबई-१.

नंतर समजले की ते दुसरे हवामान वृत्त आमच्यासाठी पण होते.

आकाश निरभ्र आहे ! आजचे जेवण उत्तम आहे. जेवणानंतर आम्ही विस्तवा-भोवती गप्पा मारीत बसतो. मला आमच्या सह्याद्रीतील अशाच रात्रींची व हिमालया-बद्दलच्या गप्पांची आठवण येते. आपण स्वप्नात तर नाहीना ? हळूहळू एकेक जण तंबूत जाऊ लागतो. मी व डॉ. एका तंबूत आहोत. १२००० फुटांवरची आमची दुसरी रात्र आहे. काल आणि आज पण अरोरानेच झोपण्याच्या पिशवी ऐवजी ३ लँब्केटस् घेतली. त्याला फार त्रास झाला असणार. उद्या आम्हाला त्याची पिशवीच शिवली पाहिजे. मीच ती उद्या घेईन व नंतर पाळीपाळीने सर्वजण. " बडा साव, कॉफी " कुंदन बाहेरून ओरडतो. शेवटी झोपताना गरम पेय बरे वाटते. मी सर्व सामान लावतो. " Good night Dr. " माझ्या डोक्यात दुराशी खिड आहे. उद्या सर्व हमाल सुखरूप जावोत—एकही बोजा न पाडता.

## २४ मे

सकाळचे सहा वाजले आहेत. आज लोपसांग व दोरजे १६ हमालांना घेऊन पुढील कॅम्पवर जाऊन परत येणार आहेत. मी तंबूच्या बाहेर येतो. हमाल त्यांच्या कॅम्पमधून येत आहेत. लोपसांग व दोरजे तयारच आहेत. मी पण त्यांच्याबरोबर जावयास हवे होते, असे मला मनात वाटत असते. सव्वा सहा वाजता ते सर्व निघतात. झपाट्याने डोंगर चढून तास सव्वा तासात पलीकडे दिसेनासे होतात. त्यांना ह्या विरळ हवेत वावरण्याचा चांगलाच सराव आहे.

आमचा मात्र हा विश्रांतीचा दिवस आहे. आणि विश्रांतीसाठी ही जागा खरोखर उत्तम आहे. आज हवा स्वच्छ आहे. नास्ता झाल्यावर आम्ही सर्व चुलीच्या भोवती शेकत बसतो. देसाई आजच्या जेवणासाठी मांसाचे तुकडे करीत आहेत. त्यांचे हात रक्ताने बरबटले आहेत. ओवळेकर, माळी व घरत त्यांना सल्ला देतात. तळावरच इकडे तिकडे इतर फिरत आहेत. आम्हाला काळजी असली तरी आम्ही मजेत आहोत. माझ्या मनात विचार येतो मांस कसे लागेल ? अनेक वेळेला अडचणीत सापडल्यावर माणसांनी कच्चे मांस खाल्ल्याचे वाचले होते. मी एक मांसाचा तुकडा तोंडात घालतो. चव उत्तम लागते, पण काही भाग नीट चावला जात नाही.

आजपासून मी गिर्यारोहणाचे बूट (climbing boot) घालावयास सुरुवात केली आहे. जरा जड आहेत, पण एक दोन दिवसात सवय होईल. आम्हाला त्यांचा अनुभव आहे. आमच्या काही सदस्यांनी पण माझे अनुकरण केले आहे. आता आमच्या जवळ भरपूर सिगारेटस् आहेत. सकाळ केव्हाच निघून जाते.

जेवणानंतर आम्ही Conference tent मध्ये बसलो आहोत. अरोरा म्हणतो, " Last night I felt very cold. " आम्ही त्याला ब्लँकेटची पिशवी शिवण्याचा आग्रह करतो. कोणालाच स्वतःला हे काम करावयाचे नसते. देसाई दाभण काढतात, प्रकाश सुतळी आणतो· घरत दाभणात सुतळी ओवून अरोराच्या पुढे करतात. मग अरोराला उठावेच लागते. अर्ध्या तासात तो ते काम पुरे करतो. आम्ही डुलक्या घेत गप्पा मारीत बसतो.

दुपारचे ४ वाजले आहेत. चहाची वेळ झाली आहे. आम्ही सर्व कंटाळून तंबूच्या बाहेर येऊन उभे रहातो. समोरच्या डोंगरावरून लोपसांग, दोरजे व हमाल परत येताना दिसतात की काय म्हणून टेहळणी सुरू आहे. पण ते इतक्या लवकर येतील असे आम्हाला कोणालाच वाटत नाही. अंधार पडायच्या आत ते यावे एवढीच आमची अपेक्षा आहे. एवढ्यात कोणीतरी ओरडले " अरे तो पहा लोपसांग. " आणि खरोखरच डोंगर उतारावरून तो पळतच खाली येत आहे. सर्व हमाल व दोरजे त्याच्या पाठोपाठ आहेत. कमाल आहे. एवढी कठीण खिड ओलांडून पलीकडे जाऊन ते इतक्या लवकर परत पण आले. दुराशी खिड आता फारशी कठीण नसावी. खिडीत बर्फ नसल्याचे आम्हाला अगोदरच समजले आहे.

आम्ही त्या सर्वांसाठी चहा करण्यास सांगतो. धापा टाकीत एकेक हमाल कॅम्पमध्ये येतो. त्यांच्या चेहऱ्यावर थकवा आहे; पण एक उतम कामगिरी केल्याचा अभिमान व आनंद आहे. आम्ही ' शाब्बास ' म्हणून त्यांना शाबासकी देतो. प्रथमच त्यांना आम्ही सिगारेटस् व बिस्कीटे देत आहोत. ते सर्व खूष होतात व त्यांच्या तळाकडे जातात. रात्री जेवण करून खाल्ल्यानंतरच त्यांना विश्रांती मिळणार. लोपसांग व दोरजे जराही थकलेले वाटत नाहीत.

काल लताला राहिलेले १३ बोजे आणण्यास पाठविलेले हमाल ५-२५ वाजता वर येऊन पोहोचले, त्यांनी सर्व सामान आणले आहे. त्यांच्याबरोबर जयसिंग आहे. त्याने आम्हाला भेट म्हणून एक डबा भरून रक्षी आणली आहे. " साब, हमारे घरमे बनाई हुअी है, " तो सांगतो. जेवणापूर्वी तंबूत बसून आम्ही रक्षीची चव घेतो. पण ती सर्व आम्हाला संपत नाही. " साब, हररोज नही लेना " लोपसांग म्हणतो. आम्ही उरलेली रक्षी जयसिंगला परत करतो व हमालांना देण्यास सांगतो. आजच्या रात्रीच्या जेवणात मांस आहे. जेवण रुचकर वाटते. रक्षीमुळे अधिकच.

बहादुरसिंगचे एक पाऊल कापलेले आहे. आजच सकाळी ही गोष्ट माझ्या ध्यानात आली. जवळजवळ निम्मे पाऊल कापलेले आहे. तरी तो त्यावर बूट घालतो व चांगलाच बोजा उचलतो. तो गोरटेलासा आहे. कुडी लहानच, पण काटक आहे. जो गणवेश घालून आला होता तोच अजून त्याच्या अंगावर आहे. नेहमी हसरा चेहरा, कामाचा कंटाळा नाही. DGBR च्या संघटनेत काम केले असल्याने कामात व वागण्यात शिस्त आहे. स्वयंपाकाच्या सामानाचा बोजा उचलून पुढे जायचे व

आम्ही पोहोचण्याच्या आत चहा तयार ठेवायचा. सर्व काम मनापासून करतो.

रक्षी व त्यावर उत्तम जेवण. डोळे मिटू लागतात. आम्ही सर्व लवकरच तंबूत जातो.

उद्या आम्ही दुराशी खिड ओलांडणार.

## २५ मे

सकाळचे ७।। वाजले आहेत. हवा थंड आहे. आकाश गडद निळे. असा निळा रंग समुद्रसपाटीवर, विशेषतः शहरात कधीच पहावयास मिळत नाही. आमची निघण्याची तयारी झाली आहे. काल १६ बोजे पुढे गेल्याने आज आमच्या पाठीवरील वजन कमी करता येईल असे मला वाटले होते. पण उलटेच झाले. २ हमाल शिधा आणण्यासाठी पाठविल्याने हमालांना आमचे काहीच सामान देता आले नाही. आमच्या रकसॅक अधिकच जड आहेत किंवा वाटताहेत. कदाचित उंचीमुळे असेल.

हमाल पुढे निघतात. आम्ही त्यांच्या पाठोपाठ चालू लागतो. पाठीवरील वजनामुळे आमचा वेग मंदावला आहे. अजून आम्ही उंचीला नीट सरावलो नाही. प्रथम प्रथम तर १०० फुटापेक्षाही कमी चढून आम्हाला थांबावे लागते. परवाप्रमाणेच प्रथम आम्हाला समोरील टेपाड चढावयाचे आहे. आम्ही माथा गाठतो. माळी व घरत येथे प्रथमच येत आहेत. बथारटोली हिमाल, नंदाघुंटी, रोंती व देवीस्थान. थोडी विश्रांती घेण्यास, माळींना व घरतांना ही शिखरे दाखविण्याची चांगली सबब आहे. आम्ही थांबतो. थोडी आणखी छायाचित्रे.

आता आम्ही पुढे चढू लागलो. मी जेथे घसरलो ते बर्फ आले. त्याच्यावरून खंबीरपणे जाण्याचा आत्मविश्वास मला वाटत नाही. ते टाळावेच असे मी ठरविले. जरा वर चढून पलीकडे नाके. हे जास्त त्रासदायक होते पण सुरक्षितता अधिक. आमचे काही सदस्य माझ्या मागे येतात. आम्ही पलीकडे उतरतो व पुन्हा पायवाट गाठतो.

लवकरच आम्ही त्या डोंगराच्या माथ्यावर पोहोचतो. आता थोडी विश्रांती घ्यायला हरकत नाही. आजचा दिवस खरोखर छान आहे. आकाशात एकही ढग नाही. दोन्ही बाजूला खोल दऱ्या. पलीकडे हजारो फूट उंच पर्वत. त्यांच्याही पलीकडे ढगात तरंगणारी हिमशिखरे.

हमालांचा हा रस्ता परिचयाचा आहे. ते सुद्धा मधे मधे बसतात. विश्रांतीसाठी ते उत्तम जागा निवडतात. आम्ही त्या जागेपर्यंत पोहोचलो की आम्हाला ती देऊन पुढे निघतात. आमच्यापेक्षा त्यांचा वेग अधिक आहे. तरी त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या पाठीवर ६० पौंड तरी वजन आहे. आमच्या सर्वात अधिक वजन प्रकाशच्या रकसॅकचे

आहे. ४० पौंडांपेक्षा जास्त. बाकी आमच्या सर्वांच्या पाठीवर ३० पौंडांपेक्षा थोडे कमी अधिक वजन आहे.

हमाल पायवाटेवर एका ओळीने जाताना दिसतात. ते वाटेवर विखुरले आहेत. त्यांच्या चालण्यात सहजता आहे. वाटेने त्यांच्या बोलीत मोठमोठ्याने गप्पा मारीत हास्य विनोद करीत ते चालतात. आम्ही पण त्या वाटेवर पसरलो आहोत. आमचे लहान लहान गट पडले आहेत. माळी, डॉ. व ओवळेकर मागे राहिले आहेत. मला वाटते व्यंकीसह लोपसांग त्यांच्याबरोबर आहे. आम्ही बाकी ५ सदस्य बरोबर आहोत. आम्ही परवा जेथपर्यंत पोहोचलो त्याच्या बरेच पुढे आता आलो आहोत. उंची तेवढीच म्हणजे १३५०० फूटच असावी. जास्त जास्त बर्फ लागत आहे.

आम्ही विश्रांतीसाठी थांबतो. बिस्कीटे आहेतच. तहान लागली आहे, पण आमच्या जवळ थोडेसेच पाणी आहे. बर्फातच एका खडकावर आम्ही बसलो आहोत. पाणी वहात आहे, पण बर्फाच्या खालून आम्हाला फक्त त्याचा आवाज ऐकू येतो. मी थोडासा बर्फ खातो. खरे म्हणजे बर्फ खाणे अपायकारक आहे. लागलीच घसा धरतो. पण बर्फ न खाता तोंडात विरघळू दिल्यास काहीच होत नाही. आम्ही सिगा-रेट पेटवितो व मग गप्पा सुरू होतात. आमच्या समोरच एक बर्फाचा उतार आहे. एक छोटेसे टेकाड आहे. ३०–४० फूट उंच असेल. अरोरा त्याच्यावर चढतो. भुस-भुशीत बर्फाचा त्याच्यावर थर आहे. आम्ही ग्लिसेडिंग (glissading) बद्दल बोलत आहोत. " Arora, Give a demonstration. " ओवळेकर अरोराला म्हणतात,




गंमतीने. अरोरा तयार होतो. 'पोज' घेऊन तो घसरण्यास सुरवात करतो. ग्लिसेंडिंग म्हणजे बर्फाच्या उतारावर तोल संभाळीत, दोन्ही पायावर घसरत खाली यावयाचे. पावले उचलायची नाहीत, तोल संभाळता आल्यास फार मजा वाटते, नाहीतर फजीती होते. पहिले काही फूट अरोरा सरळ व्यवस्थित आला, पण मग त्याचा तोल सुटला व तो गडबडत कोलांटचा खात खाली आला. हातातली कुऱ्हाड कोठल्या कोठे फेकली गेली. पायथ्याशी पोहोचल्यावर तो हसला, कुऱ्हाड परत मिळविली व मुकाटचाने जागेवर येऊन बसला.

आम्ही विश्रांती संपवून उठतो. पुन्हा पहिल्यासारखेच दोन गट पडतात. एक लांबच्या लांब बर्फाचा पट्टा. पण बर्फाची आता आम्हाला भीती वाटत नाही. पायात गिर्यारोहणाचे वजनदार बूट आहेत. आत्मविश्वासाने आम्ही बर्फ तुडवीत जातो. पट्टा ओलांडताच समोर एक ३० फूट उंचीचा कडा. तो चढून जावयास हवा. फारसा कठीण नाही. पण मातीत रुतलेले खडक ढिले आहेत. जरा जास्त जोर केला की पटकन हातात येतात. शिवाय आमच्या पाठीवर रकसॅक व हातात कुऱ्हाडी. आम्ही एकेकजण काळजीपूर्वक वर चढतो. सर्व वर पोहोचतो. व जरा थांबून आसपास पहातो; तो दुसऱ्या बाजूने अगदी सोप्या वाटेने काही हमाल चढताना दिसतात.

आम्ही थांबतो. आमची दुसरी तुकडी बरीच मागे राहिली आहे. व्यंकीची रकसॅक पुन्हा मोडली, म्हणजे त्याने बांधलेला हातरुमाल सुटला. त्याने ती पुन्हा कशीतरी बांधली आहे. आता ते सर्व बोलता येईल इतक्या अंतरावर आले. आम्ही पुढे निघतो.

आता खिंडीपूर्वीची शेवटची चढण. सगळीकडे बर्फ आहे. हा बर्फाचा बराचसा उभा चढ आहे. उतारावर थोडेसे वहाते पाणी. मला मोह होतो. मी थांबतो. माझा पेला काढतो. प्रकाश पण माझ्याबरोबर आहे. पण पाणी पेल्यात घेण्याइतके नाही. आम्ही कसेतरी थोडे पेल्यात जमा करून पितो. पण पोटभर पिता येत नाही. घरत, अरोरा व देसाई पुढे गेले आहेत. आम्ही त्यांच्या मागोमाग जातो. अरोरा व घरत थोडे वर चढले आहेत. आमच्या वर जवळजवळ १०० फूट ते दिसत आहेत. अरोरा चांगलाच काटक आहे. ते दोघे जण धिमेपणाने चढत आहेत. देसाई मात्र फारच हळू. त्यांच्या नेहमीच्या वेगापेक्षा आताचा वेग फारच कमी आहे. ते थकलेले पण दिसतात. मी त्यांच्या मागोमाग चढत आहे. प्रकाश जरा पुढे गेला आहे. त्याचे उत्तम चालले आहे. आमच्यातील सर्वात लहान २१ वर्षे या वयाचा. चांगलाच फायदा असतो. आम्ही एका टेपाडाच्या माथ्यावर पोहोचतो. खिंडीत पोहोचण्यासाठी अजून १०० फूट वर चढावयाचे आहे. अगदी उभा चढ आहे. चढ आमच्या डाव्या बाजूला आहे. घरत व अरोरा आता दिसत नाहीत. आम्ही थोडा वेळ विश्रांती घेतो.

आमच्या मागे राहिलेली तुकडी ह्या शेवटच्या चढणीच्या पायथ्याशी येऊन पोहोचली आहे. "all the best" डॉक्टर आरोळी देतात. सर्व मजेत आहेत. खाली विश्रांती घेत बसले आहेत.

मी पुढे निघतो. प्रकाश पण माझ्या पाठोपाठ येतो. देसाई मात्र इतरांची वाट पहात थांबतात. आम्हाला आता एक कोपरा पार करावयाचा आहे. सर्व बर्फ आहे. खडकाप्रमाणे कठीण व अगदी गुळगुळीत. मी पुढे पाउल टाकतो. डाव्या बाजूला अगदी जवळजवळ उभी घसरण. मला पाऊल बरोबर राहील असे वाटत नाही. ते घसरण्याची भीती वाटते. मी पाय मागे घेतो. प्रकाशला लक्ष ठेवण्यास सांगून, तेथे अगोदरच खणलेली पायरी माझ्या कुऱ्हाडीने मोठी व व्यवस्थित करतो. येथे जर का पाय घसरला तर सरळ ५०० फूट खाली खडकावर. पण दोन पावले टाकताच आम्ही सुरक्षित भागात येतो. कष्टपूर्वक एकेक पाऊल टाकीत वर चढतो व शेवटी खिडीत पोहोचतो. दुपारचे १॥ वाजले आहेत.

खिडीत एकावर एक दगड रचून 'Cairn' म्हणजे उतरण केलेली आहे. जाणारा येणारा प्रत्येक माणूस एक छोटासा दगड त्याच्यावर ठेवतो. हिमालयातील निर्जन भागात रस्त्यावर खुणा करण्यासाठी अशा उतरंडीचा फार उपयोग होतो. जाता जाता सहज २–३ दगड एकावर एक रचून उतरंड करता येते. मोक्याच्या जागेवर केली म्हणजे चटकन डोळ्यात भरते. काही वेळेला तर दोनच दगड अगदी विचित्र आकाराचे, असे ठेवलेले असतात की, कोणी आधुनिक शिल्पकारानेच ती रचना केली असावी असे वाटते.

अरोरा व घरत खिडीत बसलेले आहेत. हीच ती दुराशी खिड. तिच्याबद्दल आम्ही बरेच वाचले आहे. येथे पोहोचण्याची इच्छा बरेच वर्षे मनात होती. आज मी त्या खिडीत उभा आहे. खिडीत, मग ती कितीही लहान असो मला नेहमीच मौज वाटते. ती ओलांडल्यावर अज्ञाताचे दर्शन घडणार असते. आणि ही तर हिमालयातील एक जगप्रसिद्ध खिड होती. १४००० फूट उंचीवरच्या या खिडीतूनच या बाजूने ऋषिगंगेच्या दरीत प्रवेश करता येतो व पुढे नंदादेवीच्या परिसरात पोहोचता येते. त्या भयंकर दरीच्या वरच्या भागाचे हेच प्रवेशद्वार आहे.

मी त्या उतरणीजवळ बसतो. आता भूक लागली आहे. आज आमच्या डब्यात शिरा व चीज आहे. मी डबा उघडतो व ते संपवतो. थोडी विश्रांती घ्यायला हरकत नाही. आता सिगारेट हवी. पण माझ्याजवळच्या संपल्य आहेत; परंतु खिशातल्या डबीत थोड्या विड्या आहेत. वाटेत इकडील माणसांची ओळख व्हावी म्हणून मुंबाईहूनच बरोबर आणलेल्या. मी एक विडी काढतो. आता पेटवणार कशी? वारा फारच आहे. प्रकाश मला मदत करतो. शेवटी विडी पेटते. मी मजत झर घेत बसतो.

देसाई आता वर येऊन पोहोचले आहेत. माळी पण येताना दिसत आहेत. अरोरा व घरत निघतात. मी पण उठतो. 'पायवाट कोठे आहे?" "तिकडे समोर असेल पहा." देसाई म्हणतात. मी त्या बाजूला टोकावर जाऊन पहातो. सरळ कडा! येथे पायवाट असणे शक्य नाही. एवढ्यात प्रकाश म्हणतो. "ही पहा

पायवाट इकडे आहे." आणि ती बरोबर विरुद्ध दिशेला आहे. मी व प्रकाश निघतो. अरोरा व घरत जरा पुढे गेलेले आहेत. आम्ही त्यांना थांबावयास सांगतो व गाठतो. आता आम्ही चौघ बरोबर राहू. एवढ्यात मागून कोणीतरी धावत येतो– लोपसांग, " Sir, I will go ahead and send sume porters to take the load of those behind. " तो सांगतो व पुढे निघतो त्या अरुंद पायवाटेवर तो जवळजवळ धावतच आहे. त्याच्या चालीतील आत्मविश्वास व डौल मनोवेधक आहे. आम्ही मात्र त्या धुंदी आणणाऱ्या वातावरणात आमच्या चालीने चालत रहातो. आमच्या डाव्या बाजूला निळ्या आकाशात घुसणारे उत्तुंग खडकाळ कडे आहेत. उजवीकडे ऋषिगंगेची दरी आहे. जवळजवळ ४–५ हजार फूट खाली नदी वहात आहे. येथून एक अरुंद पांढरी पट्टीच दिसते. पायवाटेपासून खाली नदीपर्यंत उभे कडेच आहेत. आमच्या पावलांनी सरकणारे दगड नाचत नाचत खाली जातात व दिसेनासे होतात. दृष्टिपथात एक सुद्धा थांबत नाही. खोली म्हणजे काय याची कल्पना येथेच येते. नदीच्या पलीकडील बाजूस रौंतीपर्वताचे सरळसोट कडे उभे आहेत.

आम्ही एक वळण घेतो आणि समोर एक विलक्षण देखावा दिसतो. नंदादेवी (२५६४७ फूट) ढगात तरंगत आहे. सूर्यकिरणात चकाकणारे अद्भुत दृश्य होते. आम्ही क्षणभर थांबतो

आता सर्व उतार आहे. १४४४० फुटावरून पुन्हा आम्ही ११॥ ते १२ हजार फुटांवर जाणार. पण आम्ही थांबत थांबत रमत गमत जातो. समोरच एक बर्फाचा पट्टा दिसतो. लांबून आता ह्या बर्फावरून जावे लागणार असे वाटते. थोडीशी काळजी पण वाटते. कारण येथे पाय घसरून चालणार नाही. पण जवळ जातो तो बर्फ टाळून जाणारी पायवाट दिसते. पुढे थोड्या वेळाने आणखी एक तसाच पट्टा लागतो.

आता आमच्या समोर एक मोठा उतार आहे. तो. सरळ नदीकडे खाली जातोसा वाटतो. डाव्या बाजूला खोल दरी व समोरच तिच्या पलीकडील बाजूची सरळ भिंत. त्या भिंतीवर काळे पांढरे ठिपके मोठे मजेशीर दिसतात. पांढरे ठिपके बर्फाचे व काळे त्यांच्यामधून दिसणाऱ्या खडकांचे, पण पायवाट कोठे आहे ती दिसत नाही. त्या डावीकडील दरीच्या पलीकडील डोंगरावर हमाल बसलेले दिसतात. एवढ्यात घरतला पायवाट सापडते. अगदी सरळ डाव्या बाजूच्या त्या दरीत उतरणारी. आम्ही खाली खाली जातो. प्रत्येक पाऊल जपून टाकावे लागते. दरीच्या तळाशी एक चिंचोळी गली आहे, डोंगराचा एक भाग घसरल्याने झालेली. खूप दगड व माती. अरोरा सर्वांच्या पुढे आहे. नंतर घरत, त्याच्यामागे मी व माझ्या पाठीमागे प्रकाश. आम्ही त्या गलीच्या बाजू बाजूने पुन्हा खाली खाली जात आहोत. माझ्या मनात विचार आला की, याच्यापेक्षा त्या गलीतूनच चालणे सोपे जाईल. तेथे उतार एवढा जाणवणार नाही. मी वाट सोडून गलीत शिरतो. पण २–४ पावले टाकतो

न टाकतो तोच पायाखालील माती व दगड घसरू लागतात. घाईघाईने मी परत वाटेवर येतो. पण येथेसुद्धा चालणे तेवढे सोपे नाही. सारखे पायाखाली गोटे येतात. पायात चांगले बूट आहेत म्हणून ठीक, नाहीतर केव्हाच पाय मुरगळला असता.

शेवटी उतार एकदाचा संपला. आता आम्ही मोठमोठ्या दगडांवर उड्या मारीत जातो. प्रचंड दगड विखुरलेले आहेत. १०० एक यार्ड अंतर त्यातून जावयाचे आहे. पलीकडे पुन्हा चढ, पण थोडाच. जेमतेम २०० फूट असेल. समोरून मीरवानसिंग व आणखी ३ हमाल येतात. ते मागे राहिलेल्या लोकांचे सामान घेण्यासाठी जात आहेत. " नमस्ते साव. अभी कॅम्प नजदीक है. " मीरवानसिंग जाता जाता म्हणतो. थोडासा अंधार झाला आहे. संध्याकाळ झाली आहे. आकाशात ढग आले आहेत. प्रकाश जरा मागे राहिला आहे. आमच्या सर्वात त्याची रकसॅक जड आहे.

आम्ही तो पलीकडला चढ चढतो व माथ्यावर बसतो. काही हमाल पण तेथे विश्रांती घेत बसले आहेत. आम्ही काही बसलो आहोत त्याच्या थोडे वर लाकूड-फाटा गोळा करताना दिसतात. आता आम्हाला एका प्रचंड उतारावरून जावयाचे आहे. उतार अगदी साधा पण लांबच्या लांब आहे. त्याच्यावरून जायला फार मजा वाटते. आमच्या तळाची जागा येथून दिसत नाही. पण तळावर पोहोचलेले हमाल वावरताना दिसतात.

आकाश ढगाळले आहे. आम्ही ११५०० फट उंचीवर असू. ढगांनी सभोवतालचे डोंगर झाकून गेले आहेत. आम्ही झपाट्याने चालतो व थोड्याच वेळात तळावर पोहोचतो. दुपारचे ४–३० वाजले आहेत. पण ढगांमुळे बरीच संध्याकाळ झाली असे वाटते.


" All the best Saab " लोपसांग आमचे स्वागत करतो. तो आमच्यात चांगलाच मिसळला आहे. थट्टा विनोद पण करू लागला आहे. He has a class. आमचे तंबू उभारून कॅम्प लागलेला आहे. कुंदन चहा आणतो. कुंदन २०–२२ वर्षाचा असेल. गोरापान व नाजुक चेहरा. देखणा आहे. चेहऱ्यावरचे निरागस भाव अजून गेले नाहीत. सदा हसतमुख. केव्हाही काहीही सांगा– " हाँ साव, करता हूँ साव. " आमच्या जेवणाच्या ताटल्या त्याने केव्हाच ताब्यात घेतल्या. प्रत्येक जेवणाच्या स्वच्छ धुतलेल्या ताटल्या आमच्या हातात पडतात. कोणती कोणाची ताटली हे पण त्याच्या लक्षात आहे. ह्या सगळ्यासाठी त्याला जादा पैसे मिळणार आहेत असे मुळीच नाही.

लोपसांग व दोरजे माझ्याजवळ येऊन बसतात. बोलण्याचे काम लोपसांग करतो. दोरजे आमच्याकडे पाहून हसतो व क्वचित् एखादे वाक्य बोलतो. आमचे घरत वगैरे सदस्य त्याला बोलके करण्याचा खूप प्रयत्न करतात. पण भाषेच्या अडचणीपुढे विचारा काय करणार ? " Sir, there are 13 Nepalis here. They are prepared to come with us. I have talked with leadman. "

लोपसांग सांगतो. " बहोत अच्छा " मी म्हटले. " We can make a double march and reach the next campsite in a single day. ' लता खडकावर वाया गेलेला दिवस वाचविता येईल असे त्याचे म्हणणे. कल्पना चांगली आहे. मी तात्पुरते " ठीक आहे " म्हणतो.

आमचा कॅम्प एका भिंतीप्रमाणे सरळ असलेल्या कड्याच्या आडोशाला आहे. हा कडा सगळा स्लेट रॉकचा आहे. म्हणजे या खडकाचे पातळ थर निघतात, लिहिण्याच्या पाटीसारखे. असे लहान मोठे तुकडे येथे सगळीकडे विखुरलेले आहेत. आमच्या तंबूच्या समोर कड्याला लागूनच एक धनगराचे खोपटे आहे. त्याचे छप्पर याच दगडांचे केले आहे. धनगर तेथेच बसला आहे. आसपास थोड्या मेंढ्या आहेत.

हमाल विश्रांती घेत बसले आहेत. घरत त्यांना सिगारेट वाटतो. नेपाळी माणसांचा तळ पण जवळच आहे. ते आमच्या हमालांशी बोलत बसले आहेत. त्यांना पण सिगारेटस् देण्यात येतात. त्यामुळे तरी त्यांना उद्या आमच्याबरोबर यायचा लोभ व्हावा.


बृहन्मुंबईकरिता वितरक :

मे. बी. जयंतीलाल ॲण्ड को., १५ मंगलदास रोड, मुंबई २

बृहन्मुंबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक :

मे. वाय्. एस्. प्रभू ॲण्ड सन्स, १२ हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ५७

आम्ही मागे राहिलेल्या तुकडीची वाट पहात आहोत. आता अगदी अंधारून आले आहे. सर्व आकाशात काळे कुट्ट ढग आहेत. क्वचित् लांब वीज चमकते. एक वाऱ्याची झुळुक. धूळ हवेत उडते व वादळ फुटते. अगदी वरोवर हिमालयीन वादळ आहे. आता विजांचा कडकडाट व ढगांचा गडगडाट सुरू होतो. बर्फ पडू लागते आसपासचे डोंगर दिसेनासे होतात. आम्ही मागे राहिलेल्या लोकांसाठी, चहा घेऊन आणखी हमाल पाठवितो.

६–६/१५ नंतर त्यांच्यापैकी एकेकजण कॅम्पवर येऊ लागतो. ते शेवटच्या उताराव वरच वादळात सापडलेले. बर्फ कोरडाच होता. हा एक गमतीदार अनुभव असतो. वर्फ पडते. पण हवा थंड असल्याने विरघळत नाही. कपडे जरा झटकले की, ते समुद्रावरील वाळूप्रमाणे पडते. कपडे ओले होत नाहीत. त्यांना खूप मजा वाटली.

माळींनी रस्त्यात भेटलेली, लता गावातली ६ माणसे आमच्या हमालात सामील करण्यासाठी त्यांच्यावरोवर आणली आहेत. ती धरून आता आमच्या-वरोवर जरूरीपेक्षाही जास्त माणसे झाली आहेत. आमच्या आशा उंचावतात. उद्या दुप्पट चाल करून दिव्रुगेटावर न थांवता थेट देवडीपर्यंत जाण्याचा आम्ही निर्णय घेतो. पण हवामानाची मात्र काळजी आहे.

आसपासच्या डोंगरावर चरावयास गेलेल्या मेंढ्या परत येऊ लागतात. मेंढ्या–मेंढ्या – चहूकडे मेंढ्याच मेंढ्या. आमच्या तंबूभोवती सारखे बाऽऽ बाऽऽ अविरत चालले आहे. शेकड्यांनी मेंढ्या आहेत. या सर्व मेंढ्या घेऊन २–३ महिने हे मेंढपाळ या किंवा पुढल्या म्हणजे दिव्रुगेटाच्या तळावर रहातात व मेंढ्यांची लोकर वाढली की ती विकण्यासाठी त्यांना पर्वताच्या खाली घेऊन जातात. ह्या मेंढ्या म्हणजे त्यांची मोठी इस्टेटच आहे.

शेवटी वर्फ थांवते. अंधार पडला आहे. आकाशात ढग आहेतच. आता जेवण. आज पण साधाच बेत आहे. भात व वरण. धनगरांनी शेकोटी पेटविली आहे. मी माझी थाळी घेऊन शेकोटीजवळ वसतो. शेकोटीच्या विस्तवावर रोटी भाजून धनगर ती मिठावरोवरच खात आहेत. माळी कुंदनला त्यांना थोडे वरण देण्यास सांगतात. डॉक्टरांनी धनगराजवळून मेंढ्यांचे दूध मिळविले आहे. ते आज जेवणार नाहीत.

आम्ही लवकरच तंबूत जातो. आजचा दिवस शरीर व मन दोन्ही शिणविणारा होता. मी मात्र खुषीत आहे. दुराशी खिंड आम्ही मागे टाकली आहे.


(क्रमशः)

# चौथे मराठी चित्रपट व्यावसायिक संमेलन

## नाशिककरांची व्यवस्था : कलाकारांची अनास्था

बऱ्याच वेळा असे घडते की विचारपूर्वक ठरवून केलेल्या गोष्टींपेक्षा, अनपेक्षितपणे अन् अल्पावधीत जमलेल्या गोष्टीच मोठ्या उठावदार आणि स्मरणीय ठरतात. दि. २२ आणि २३ नोव्हेंबर रोजी नाशिक येथे भरलेल्या चौथ्या मराठी चित्रपट व्यावसायिक संमेलनाचे अगदी असेच झाले. वास्तविक याच तारखांना हे संमेलन दिल्लीमध्ये भरणार होते. गेले काही महिने तसा खूप गाजावाजा झालेला, भरपूर तयारीही केलेली पण — दैवाच्या मनात काही वेगळाच विचार होता. दिल्ली दरबारचे वातावरण असे काही विचित्र आकार घेत गेले की संमेलन समितीला मोठ्या नाईलाजाने दिल्ली ऐवजी नाशिकची निवड करावी लागली. अवघ्या पंधरा दिवसांचा अवधी देऊन नाशिककरांवर फार मोठी जबाबदारी टाकण्यात आली. पंधरा सोळा दिवसांच्या अवधीत संमेलन उभे करणे म्हणजे सोपी गोष्ट नाही. पण जिद्द आणि दुर्मिळ संघटन-कौशल्य या जोरावर, नाशिककरांनी कुणीही आश्चर्य करावे अशा तऱ्हेने संमेलनाची उभारणी केली. साहजिकच संमेलनाला जमलेले सारे प्रतिनिधी मुक्त मनाने नाशिककरांच्या चोख व्यवस्थेची प्रशंसा करीत परत फिरले.

संमेलन म्हटले की चर्चा, भाषणे, परिसंवाद या गोष्टी अपरिहार्य ठरतात. या संमेलनातही त्या सर्व होत्या; पण विशेष हाच की नेहमीप्रमाणे या गोष्टी रुक्ष कंटाळवाण्या न वाटता बऱ्याच रंजक आणि स्मरणीय वाटल्या. उद्घाटन समारंभातील स्वागताध्यक्ष, उद्घाटक आणि अध्यक्ष या तिघांचीही भाषणे उत्तम वाटली. सहसा असा योग येत नाही. कुणीतरी वैताग देतोच. इथे तसे घडले नाही. स्वागताध्यक्ष श्री. दादासाहेब पोतनीस यांच्या भाषणातील जिव्हाळा अन् आपलेपणा, उद्घाटक कविवर्य कुसुमाग्रज यांच्या भाषणाला लाभलेले वैचारिक अधिष्ठान अन् साहित्यिक दर्जा, अध्यक्ष गजानन जागीरदार यांचे अनुभवी पण परखड विचार



साऱ्या नाशिककरांनी ही पदयात्रा मोठ्या उत्सुकतेने पाहिली.

यांचा समन्वय झकास होता. हीच गोष्ट समारोप समारंभाची. या समारंभाला खरी शान आली ती जुन्या कलाकारांच्या सत्कार कार्यक्रमामुळे. भारतीय चित्रसृष्टीचे जनक कै. दादासाहेब फाळके यांची नाशिक ही कर्मभूमी — भारतात पहिला स्टुडिओ उभारला गेला तो नाशिकमध्येच. त्यामुळेच दादासाहेबांच्या बरोबरीने अगर त्यांच्या हाताखाली काम केलेले अनेक कलाकार अगर तंत्रज्ञ आज नाशिकमध्ये आहेत. ह्या साऱ्या जुन्या लोकांना अध्यक्षांच्या हस्ते श्रीफळ आणि पुष्पहार अर्पण केला गेला. जुन्या लोकांविषयी आजच्या पिढीने व्यक्त केलेला हा आदर, त्यांचा केलेला सन्मान खरोखर अभिनंदनीय वाटतो. हा समारंभ चालू असताना त्या वृद्धांच्या डोळ्यात आनंदातिशयाने साठलेले अश्रू पाहून, त्यांची गहिवरली मुद्रा पाहून कृतकृत्यता वाटली. अशीच धन्यता कलाकारांची पदयात्रा पहातानाही वाटली. कै. फाळके यांनी ज्या जागी पहिला स्टुडिओ उभारला ती जागा आज बरीचशी पडीक आहे. फारच थोडे जुने अवशेष आज तिथे शिल्लक आहेत. तरीही त्या स्थानाचे महत्त्व लक्षात घेऊन सारे कलावंत मिरवणुकीने पायी चालत त्या जागी गेले. कै. फाळके यांना आदरांजली वाहून परत फिरले. सध्या कै. फाळके यांचे जन्मशताब्दी वर्ष चालू आहे. त्यामुळे तर या पदयात्रेला विशेष महत्त्व आलेले ! ! साऱ्या नाशिककरांनी ही पदयात्रा, कै. फाळके यांच्याविषयी कलाकारांनी दाखविलेली कृतज्ञता मोठ्या उत्सुकतेने पाहिली. कलाकारांचे, पदयात्रा आयोजित करणाऱ्यांचे तोंड भरून कौतुक केले.

कला आणि व्यवसाय म्हणून मराठी चित्रपट प्रगतिपथावर आहे का ? या विषयावर एक खुली चर्चा आयोजित केली होती. अनेकांचे बरे वाईट विचार ऐकायला मिळाले असले, तरी ही चर्चा स्मरणीय करण्याची फार मोठी कामगिरी केली ती ग. दि माडगूळकरांनी ! ! सभेत चैतन्य निर्माण करून, व्यावसायिकांना

खरेखुरे मार्गदर्शन करणारे त्यांचे विचार ऐकताना उत्तम भाषण कसे असावे याचीच साक्ष पटली. अनेक दाखले, उदाहरणे देऊन त्यांनी आपल्या भाषणात वजन निर्माण केले. आज चित्रनिर्मिती करणाऱ्या संस्था नाहीत, अभ्यासूदृष्टीचे दिग्दर्शक नाहीत, म्हणूनच व्यवसायाला उतरती कळा लागल्यासारखा भास होतो, असे सांगताना त्यानी व्यवसायातील लोकांना जिद्दीने, सर्वस्व पणाला लावून उभे ठाकण्याची सूचना केली. ते म्हणाले, " आज अमावास्या असली तरी उद्या प्रतिपदा येणार आहे हे पक्के ध्यानात घ्यावे. त्याच आशावादी वृत्तीने वाटचाल केली पाहिजे." माडगूळकरांप्रमाणे दिनकर पाटील, अनत माने, विनायकराव सरस्वते, द. स. अंबपकर आदी व्यावसायिकांनी आणि काही अन्य व्यक्तींनी आपल्या मताचे समर्थन केले. पण माडगूळकरांची सर कुणालाच आली नाही.

चर्चा-परिसंवादाच्या कार्यक्रमांची आखणी संमेलनाच्या प्रतिनिधींसाठी असली तरी ज्या गावी संमेलन भरायचे त्या ठिकाणच्या लोकांसाठीही काही कार्यक्रम करावेच लागतात. अर्थातच हा कार्यक्रम म्हणजे करमणुकीचा असणार हे सांगायलाच नको ! नाशिककरांसाठी 'चित्ररजनी' आयोजित केली होती. त्याचे नाशिककरांनी फार मोठ्या प्रमाणात स्वागत केले. जवळजवळ सहा हजार प्रेक्षक कार्यक्रम पहायला जमले होते. सारेच कार्यक्रम दर्जेदार नव्हते, तरी शेवटपर्यंत अत्यंत शांतपणे प्रेक्षक साऱ्याचा आस्वाद घेत होते. नाशिककरांच्या सोशिकतेचे कौतुक करावे तेवढे थोडेच ! वास्तविक खरा आनंद मिळावा असे कार्यक्रम फार तर पाच किंवा सहाच. बाकी सारे भरताड. सुधीर फडके यांचे गायन, ग. दि. माडगूळकरांचे कथाकथन, बाल कलाकार सचिन याच्या नकला, जीवनकलचे नृत्य, दादा कोंडके यांची मुंबईची लावणी, श्यामा सरस्वते हिचा एकपात्री कार्यक्रम आणि धुमाळ-नीलम-गुलाब कोरगावकर या तिघांनी सादर केलेले प्रहसन, एवढेच काय ते नाव घेण्याजोगे कार्यक्रम ! जयश्री गडकरचे नृत्य या कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण – पण पडद्यावर बिजलीसारखे नृत्य करणारी जयश्री गडकर प्रत्यक्षात अत्यंत बेंगरूळ नृत्य करते. तिच्या नाचाला नाच म्हणण्याऐवजी बोजड हावभाव म्हटले तरी चालेल. इतके ते सामान्य वाटले. बाकी इतर कार्यक्रम सामान्य झाले तर नवल नाही. ते कलाकारही त्याच योग्यतेचे ! जयश्री गडकरचे तसे नाही. ती श्रेष्ठ अभिनेत्री जरूर आहे, पण म्हणून ती उत्कृष्ट नर्तिका ठरत नाही, हे या कार्यक्रमाने कळून आले. सुमारे सहा तास चाललेला हा चित्ररजनीचा कार्यक्रम शेवटपर्यंत सुव्यवस्थित पार पडला, त्याला नाशिकचे प्रेक्षक जसे कारणीभूत तसेच नाशिकचे पोलीसखातेही. अशा कार्यक्रमांवर नियंत्रण ठेवणे सोपे नसते.

संमेलनातील दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे भोजनविभाग आणि निवास व्यवस्था. भोजन विभागाने आपली कामगिरी अतिशय चोख बजावली होती. दोनही

दिवस प्रतिनिधींना सुग्रास अन्नाची मेजवानी दिली. अर्थात याला नाशिककरांप्रमाणेच पुण्याचे श्री. चारुदत्त सरपोतदार कारण होते हे विसरता येणार नाही. त्यांची देखरेख, अगत्य यामुळे प्रतिनिधींना अगदी घरच्यासारखेच वाटत असे. निवास व्यवस्थेबाबत मात्र बऱ्याच लोकांच्या तक्रारी होत्या. बहुतेकांचे म्हणणे इतकेच, की संमेलनाला जमलेल्या छोटया बडया साऱ्याच लोकांची एकत्रित सोय व्हायला हवी होती. बडे व्यावसायिक त्यांच्या त्यांच्या दर्जाप्रमाणे बडया बडया हॉटेलातून उतरले होते. इतर लोक मात्र एकत्र उतरविण्यात आले होते. हा भेद का केला ? संमेलने ही एकत्र येऊन, राहून साजरी करायला नकोत का ? निवासाच्या बाबतीत नाशिककरांच्या काही अडचणी असतीलही; पण मोठे व्यावसायिक वेगळे उतरले ही भावना छोटया व्यावसायिकांच्या मनाला व्यथित करीत होती एवढे खरे.

ही उणीव सोडली तर नाशिककरांनी सारी व्यवस्था अतिशय उत्तम व अगत्याने केली. सर्वश्री दादासाहेब पोतनीस, बाळासाहेब ओक, चुंबळे बंधू, इसाक मुजावर, अरविंद पोतनीस हे प्रमुख लोक, तसेच नरेंद्र कदम, मधु झेंडे, वासुदेव दशपुत्रे, दत्ता नाडगौडा, पंडित सोनावणी आदी समिती प्रमुख अत्यंत निरलसपणे सतत खपत होते.

नाशिककरांनी अद्‌भुत वाटावे अशा तऱ्हेने जरी संमेलन पार पाडले असले तरी ज्यांच्यासाठी हे संमेलन भरविले गेले त्यांच्यापैकी किती लोक आस्थेने तेथे जमले होते, हे पाहिले म्हणजे दु:ख होते. या व्यवसायात नाव कमावलेल्या लोकांतील फक्त पंधरा ते वीस लोकच हजर होते. बाकी लोकांनी येण्याचे कष्ट सुद्धा घेतले नाहीत. त्यांच्या न येण्यामागे काही कारण असावे हेच पटत नाही. कारण हे संमेलन त्यांचे होते, त्यांच्यासाठी होते. पण द्वेष, मत्सर, असूया यांनी गांजलेल्या कलाकारांना हे कसे सुचावे ? साऱ्या गोष्टी विसरून एकत्र येऊन परस्परातील हेवेदावे दूर करावेत हे या लोकांना कधी सुचणार ? गैरहजर राहिलेल्या लोकांपेक्षा हजर राहिलेल्या नामवंत कलाकारांची नावे सांगणे सोपे ! त्यात सर्वश्री भालजी पेंढारकर, ग. दि. माडगूळकर, राम गबाले, सुधीर फडके, दिनकर पाटील, अनंत माने, धुमाळ, काशीनाथ घाणेकर, चंद्रकांत, सूर्यकांत, दत्ता मायाळू (राजदत्त) ई. महंमद, राम देवताळे, कमलाकर तोरणे, दत्ताराम गायकवाड, पिळगावकर, सरस्वते, सुलोचना, रत्नमाला, उषाकिरण, जयश्री गडकर, जीवनकला, नीलम, गुलाब कोरगावकर, एवढेच काय ते विशेष; बाकी कोल्हापूरचे दीडशे, पुण्याचे पंचवीस तीस, मुंबईचे तीस पस्तीस असे दुय्यम कलाकार, अगर तंत्रज्ञ हजर होते. सहस्रावधी व्यक्ती आज या व्यवसायावर पोट भरीत असताना हे एवढेच मूठभर लोक जमावेत हे सुचिन्ह निश्चित नाही. मग लोक जर टीका करू लागले की, 'ही संमेलने भरवताच कशाला ? पैशाचा अपव्यय का करता ?' तर त्यांना हे चित्रपट व्यावसायिक काय उत्तर देणार आहेत ?

—सुधीर दामले



रंगभूमी

शरद गोखले

## हिंदी चित्रपटाच्या दिशेने निघालेली

# सात पावले

नाटकाचे पीक चालू वर्षी भलतेच बहरून आले आहे. सामाजिक, संगीत, पौराणिक, ऐतिहासिक, अशा प्रत्येक प्रांतात नवे-जुने नाटककार तळ ठोकून बसले आहेत. मादर केलेले पचले तर ठीक. वाटचाल पुढे चालू. बसले तर प्रांत बदलून खेळ चालू.— पण माघार नाही. नाटकाच्या क्षेत्रामध्ये मुरलेल्या मंडळींमध्ये कालेलकर आघाडीवर. सध्या कालेलकरांनी दुसऱ्यांच्या कथा-कादबऱ्यांचे सवाद बांधून त्यांना रंगभूमीवर आणण्याचा उद्योग चालवला आहे. या खेपेस त्यांची नजर वळली आहे प्रभाकर ताम्हणे यांच्या ' जाताना दार लावून घे ' या कथेवर.

श्रीकांत मोघे, राजा गोसावी, बबन प्रभू, रेखा, नयना आपटे अशी भली मोठ्ठी स्टार कास्ट घेऊन, आणि ' हा स्वर्ग सात पावलांचा ' असे आकर्षक नाव घेऊन कालेलकर रंगभूमीवर आले आहेत.

स्वकर्तृत्वाने जीवनाची यशस्वी वाटचाल करणारा माधव— (श्रीकांत मोघे) मालती— (रेखा)सारखी जोडीदारीण मिळाल्याने संसारसुखात अगदी मश्गुल होऊन गेला आहे. लग्नाला पाच वर्षे होऊनही घरात पाळणा हलत नाही. याचेच दोघांना— विशेषत: माधवला दु:ख आहे. मालतीला आता पुन: दिवस गेले आहेत. प्रत्येक बाळंतपण म्हणजे पुनर्जन्म, अशी अवस्था असल्याने घरात पाळणा हलणार या कल्पनेने हरखून गेलेला माधव, मनात चिंताक्रांत झालेला आहे. याचवेळी कंपनी-कडून त्याला परदेशी जाण्यासंबंधी विचारणा करण्यात आली आहे. तथापि घर सोडून जाण्याच्या मन:स्थितीत तो नाही. आपल्या काळजीने आपला नवरा एक मौलिक संधी घालवीत आहे, ही गोष्ट मालतीला मानवत नाही. माधवचे मन वळवण्यात ती यशस्वी होते. आपला स्नेही डॉक्टर गात याच्यावर मालतीची जबाबदारी टाकून माधव परदेशात जातो. मालती प्रसूत होऊन मुलगा होतो, तथापि तिची तब्येत एकदम खालवते. केवळ मानसिक शक्तीवर ती पती येईपर्यंत तग धरते; आणि माधवच्या आगमनाबरोबर मालतीच्या जीवनाचा शेवट होतो.

मालतीची आठवण माधवला हैराण करून सोडते. एकुलता एक मुलगा राजू डोळ्यासमोर नकोसा होतो. मामाकडे त्याची रवानगी होते. संसारी मामा राजूला पुन्हा त्याच्या घरी आणून पोचवतो. राजूकडे लक्ष देण्यास माधवला वेळ नसतो. राजू आजारी पडतो. त्याच्या आजाराकडे दुर्लक्ष करून माधव आपल्या नवीन

प्रेयसीबरोबर महाबळेश्वरची वाट धरतो. राजूचा आजार पोलिओ असल्याचे निदान डॉक्टर गात करतात आणि धडधाकट राजू पांगळा होतो.

मुलांचा दुःस्वास करणारी लिना आणि मालतीचा एकुलता एक ठेवा — राजू यातून एकाची निवड करण्याची वेळ आल्यावर माधव अखेरीस राजूची निवड करतो.

ताम्हणे यांच्या या कथेवर 'एक धागा सुखाचा' हा एक पुष्कळच सामाधान-कारक चित्रपट तयार करण्यात आला होता. मूळ कथेतील गोडी तिथे पातळ झाली होती, तर नाटकामध्ये कथेला असलेला भावनात्मक स्पर्श साफ नाहीसा झाला आहे.

पहिल्या अंकामध्ये माधव-मालती यांच्या प्रणय प्रसंगांतून भावी संकटाची चाहूल लागते. मालतीचा मृत्यू अशक्य नसला तरी, ज्या पद्धतीने तो दाखवला आहे, ती पद्धत विलक्षण कृत्रिम आहे. मालतीला रंगभूमीवर न आणता तिचा मृत्यू अधिक कल्पकतेने व वास्तवतेने दाखवता आला असता. कदाचित धंद्याला ही तड-जोड मानवली नसती. पहिला अंक उगाचच लांबलेला व कंटाळवाणा वाटतो. आणि त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे मूळ नाटकापासून तो वेगळाही भासतो—इतका की थोडीशी काटछाट करून खुशाल एकांकिका म्हणून या नाटकाचा पहिला अंक करावा.

मालतीच्या मृत्यूनंतर काय होणार याची कल्पना प्रेक्षकांना सहज येते. राजू-लिना-माधव या त्रिकोणाभोवती पुढील दोन अंक फिरवले आहेत. तथापि या अकांना गती नसल्याने आणि प्रेक्षकांना कथासूत्र सहज सापडत जात असल्याने दोन्ही अंक बेचव होतात. त्यातही उगाच काहीतरी चमत्कार (मालतीचा आत्मा वावरतो आहे, बोलतो आहे. इ.) करून माधवचे मतपरिवर्तन घडवण्यापेक्षा त्याच्यातील पितृवात्सल्य वासनांवर विजय मिळवते, असे दाखवले असते तर तर्कशुद्ध ठरले असते.

डॉक्टर गात आणि विमल व बबलू आणि मास्तरीण यांची उपकथानके— विशेषतः दुसरे— अतिसामान्य दर्जाची व नाटकाच्या गंभीर विषयाशी संपूर्णपणे विसंगत वाटतात. संगीतप्रेमी डॉक्टर गात यांच्या तोंडी घातलेले विनोदही सामान्य दर्जाचे आहेत. असे असूनही हे उपकथानक भाव खाऊन जाते, ते राजा गोसावी-बबन प्रभु या जोडगोळीमुळे. या जोडीने विनोदी प्रसंगांना चांगलीच रंगत आणली आहे.

अन्य कलाकारांपैकी श्रीकांत मोघे व रेखा विशेष प्रभावी वाटतात. नयना आपटे यांची लिना ठाकठीक आहे.

नाटकाच्या तांत्रिक बाजूमध्ये जसे उल्लेखनीय असे काही नाही, तसेच दोषा-स्पदही काही नाही. व्यावसायिक रंगभूमीकडून तांत्रिक परिपूर्णतेच्या ज्या अपेक्षा असतात त्या बव्हंशी पूर्ण होतात.

नाटकाचे दिग्दर्शन श्री. वसंत ठेंगडी यांनी केले आहे. तथापि त्याची दखल घ्यावी असे विशेष कौशल्य कोठे प्रतीत होत नाही. 'दिवा जळूंदे'ची 'बडी दिदी', 'अश्रूंची झाली फुले'चे 'आसु बन गये फूल' अशी सध्या मराठी नाटकांची गती असल्याने 'ये स्वर्ग सात पदोंका !' भारतीय रजतपटावर आक्रमण करता झाल्यास फारसे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

◻ ◻ ◻

# भिंतीच्या पैंबड्या

सुधाकर राजे

## माओवादी माऊ

अमेरिकेत एक बोलका पोपट आहे, त्याला साम्यवादी क्यूबातल्या ‘अॅक्सेंट’ने बोलण्याबद्दल अटक करण्यात आली आहे, असे परवा वर्तमानपत्रांत वाचले. आता पोपटपंची मुळात वाईटच असे आमचे मास्तर आम्हाला नेहमी सांगायचे. तेव्हा साम्यवादी पोपटपंची अधिकच वाईट हे निदान अमेरिकेत तरी ओघानेच आले, अन् अमेरिकेचे लोकशाही सरकार उलथून पाडण्यासाठी सशब्द कारवाई करण्याबद्दल या पोपटाला चंचुप्रवेश देखील होणार नाही अशा जागेत बंदिस्त करून ठेवणे, हे अर्थातच अमेरिकेच्या व ओघाने सगळ्या जगाच्या हिताचे आहे. या पोपटाच्या जिव्हाग्री वसणारा साम्यवाद अक्षरशः धुऊन काढण्यासाठी त्याची जीभ रोज साबणाने धुऊन काढण्यात येते, असेही या बातमीत आहे. याला म्हणतात अमेरिकन डोके! आपल्याकडे ‘लक्स टॉयलेट साबणाने माझ्या सौंदर्याला उठाव मिळतो’ अशी शर्मिला टागोर की आशा पारेखची जाहिरात रोज वर्तमानपत्रात झळकत असते. उलट अमेरिकन वर्तमानपत्रात ‘तुमच्या साम्यवाद-विरोधाला तजेला यायचा असेल तर हाच साबण वापरा’ अशी खुद्द निक्सन साहेबांची ग्वाही असलेली जाहिरात छापली जात असावी. साम्यवादाच्या नावाने (साबण लावून) आंघोळ करणे हा साम्यवाद नष्ट करण्याचा अगदी सोपा उपाय अमेरिकेने शोधून काढल्यावर तेथल्या बंडखोर हिप्पींचे व्यवच्छेदक लक्षण आंघोळ न करणे हे का असते याचा आपोआप उलगडा होतो.

आता माध्या साबणात लक्स, हमाम, लाइफबॉय असे प्रकार असतात, तर साम्यवाद-विरोधी साबणातही मार्क्सविरोधी, स्टॅलिनविरोधी, माओविरोधी अशी व्हरायटी असली तर नवल नाही. अन् हिंदुस्थानात तर अशी व्हरायटी फारच उपयोगी पडेल. कारण सध्या आपल्या देशात साबणांचे जेवढे प्रकार आहेत त्याहून अधिक साम्यवादाचे आहेत. उदाहरणार्थ, ज्योती बसूंच्या तोंडाला फेस आणण्यासाठी जो साबण उपयोगी पडेल त्याला डांगे डरतीलच असे नाही.

ते काही असले तरी या साम्यवादी पोपटाच्या प्रकरणाने मी मात्र सावध झालो आहे. गेले काही दिवस आमची मनी ‘म्याव-म्याव’ ओरडायच्या ऐवजी

'माओ-माओ' ओरडते की काय अशी मला दाट शंका येत होती,—आता त्याची खात्री पटली आहे. बहुधा या वयेने न्याहारीच्या उंदराबरोबर माओचे विचारही पचवलेले दिसतात. ही माओवादी माऊ सकाळच्या उन्हात बसून पोटातल्या पोटात गुरगुरते तेव्हा ती लिऊ-शाओ-चीचा विचार करीत असणार, यातही मला तिळमात्र शंका उरलेली नाही. सुदैवाने आमच्या मोत्याचे भुंकणे मात्र अस्सल भारतीय आहे. त्यातून इतके सफाईदार लांगूलचालन करणारे जनावर अभारतीय असूच कसे शकेल ?

**ताशी साठ मैलाची देवभक्ती**

महर्षी महेश योगींनी नुकतीच लंडनमध्ये पावणे तीन लाख रुपयांची नवीन रोल्सरॉइस गाडी विकत घेतली असून एवढे परदेशी चलन तुम्ही कोठून आणलेत, असा रिझर्व बँकेने म्हणे त्यांना जाब विचारला आहे. हे मात्र फारच झाले हं! हे म्हणजे अर्थात् जाब विचारणे. मागे या योगी महाराजांना त्यांच्या पाश्चिमात्य चेल्यांनी एक विमान दिल्याचे वाचले, तेव्हा असेच आम्हा दिक्कांना वाटले की तुकाराम-बुवांच्या पावलावर पाऊल ठेवून महर्षी महेश बहुधा मॉनिंग फ्लाइटने सदेह स्वर्गाला पोचणार. परंतु स्वर्गात पुष्पक विमानासाठी बांधलेला रन्-वे बहुधा महर्षींच्या विमानाला पुरेसा नसावा, तेव्हा त्यांनी बाय रोड परमेश्वरापर्यंत पोचायचे ठरवले तर त्यात कोणाची आडकाठी का असावी ?

आता रोल्सरॉइस ही जगातली सर्वोत्कृष्ट मोटारगाडी आहे हे सगळ्यांनाच ठाऊक आहे, तेव्हा अत्यंत बिकट अशा परलोक प्रवासासाठी महर्षींनी ही गाडी निवडली यात त्यांची नितांत ईश्वर-भक्तीच दिसत नाही काय ? रिझर्व बँकेच्या मॅनेजरसाहेबांना मी विचारतो, या प्रवासाला महर्षींनी रोल्सरॉइस नाही तर बँडमास्तर—चुकलो, लँडमास्तर वापरायची ? आता तुम्ही म्हणाल, देवभक्तीतही देशभक्ती हवी; स्वधर्मे निधनं श्रेयः या चालीवर हिंदुस्थान-फोर्टीनमधून स्वर्गाला जाताना वाटेत अपघाताने खतम होणे परवडले, पण परदेशी गाडीतून सुखरूप जाण्याचा परधर्मो भयावहः ! पण परमेश्वर आणि मोटारगाडी या दोन्ही गोष्टी सारख्याच अप्राप्य असणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला हे पटत नाही. उलट माझे तर असे स्पष्ट मत आहे की, हिंदुस्थानातल्या मोटारगाड्या रद्दी असल्या-मुळेच हिंदुस्थानातल्या आधुनिक साधु-संतांची संख्या महर्षी महेश पुरती मर्यादित राहिली आहे. चांगली गाडी असली अन् पी-फॉर्मची कटकट नसली तर आपण-देखील महर्षींच्या बरोबर स्वर्गाची वीक-एंड ट्रिप मारायला तयार आहोत.

चित्रपट

# स्वागतार्ह इत्तफाक

जम्मू-काश्मीर, सिमला, नैनिताल, अगदी काही नाही तर निदान महाबळेश्वर येथील निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेत, चालू असलेली त्याची आणि तिची धावपळ, प्रेम, गैरसमज, विरह, एखाद दुसरे विरहगीत, हाणामारी, हॉस्पीटल, ऑपरेशन, घड्याळाच्या टिकटिकीचा सस्पेन्स आणि अखेर मिलन ! सर्वसाधारण हिंदी चित्रपटांचा सांगाडा हा असा. कधी तरी क्वचित वेगळे पहायला मिळते आणि धक्का बसतो. बी. आर. फिल्मस्‌चा इत्तफाक (योगायोग) हा चित्रपट या धक्का पठडीतील.

रहस्यकथेची गुंफण या चित्रपटामध्ये केली आहे. पत्नीच्या खुनाचा आरोप असलेला एक चित्रकार कोर्टामार्फत वेडा ठरवला जातो, आणि वेड्यांच्या इस्पी-तळात त्याची रवानगी होते. हा वेडा तिथून पळून जगमोहन नावाच्या श्रीमान गृहस्थाच्या घरात प्रवेश करतो. जगमोहन बाहेर गावी गेलेले असतात. घरात त्यांच्या तरुण पत्नीखेरीज कोणीही नसते. केवळ एका रात्रीसाठी त्याला आश्रय हवा असतो. सुरुवातीला घाबरलेली वेणू थोड्याच वेळात त्याच्याबद्दल स्नेह व आपुलकी दाखवू लागते. अनपेक्षितपणे आलेले डॉक्टर त्रिवेदी, इन्स्पेक्टर दिवान् व बडबडी शेजारीण यांच्यापासून रेणू चित्रकार दिलीप रॉयला संरक्षण देते. संरक्षणासाठी बाथरूममध्ये आश्रय घेतला असताना बाथरूममध्ये दिलीप रॉयला रेणूच्या पतीचे–जगमोहनचे प्रेत दिसते. दिलीप रॉयच्या पत्नीचा खून आणि दिलीपचे हॉस्पीटलमधून पलायन या दोन्ही घटनांना गौणत्व येऊन जगमोहनचा खून झाला आहे काय ? झाला असल्यास तो कोणी केला आहे, याला महत्त्व प्राप्त होते. आणि या प्रश्नाची उत्कंठापूर्ण उकल चित्रपटाचा मुख्य भाग व्यापते. मात्र त्याचबरोबर दिलीपच्या पत्नीच्या खुनाचे रहस्यही स्पष्ट होते.

अशी ही कथा. ' धुवा ' या हिन्दी आणि ' धुम्मस ' या गुजराथी नाटकावरून कथानक घेण्यात आले आहे. याच कथेवर पुण्याच्या सरस्वती मंदिर नटसंघाने ' अठ्ठावीस दिवस ' नावाचा एक सुंदर नाटयप्रयोग श्री. अनंत ओक यांच्या दिग्दर्शनाखाली सादर केला होता. त्याची चित्रपट पहात असताना वारंवार आठवण होते.

कथा मूल्यांच्या दृष्टीने विचार करता चित्रपटाची कथा अतिशय सामान्य आहे. घडणारी प्रत्येक घटना ही केवळ योगायोगाने घडत असल्याने वास्तवतेच्या कसोटीवर कथेचा मुळीच टिकाव लागणार नाही. आणि असे असूनही चित्रपट मनाची पकड घेतो. त्याचे श्रेय, उत्कृष्ट तांत्रिक बाजू, कलाकारांनी जीव ओतून बजावलेली कामगिरी आणि दिग्दर्शकाची कौशल्यपूर्ण हाताळणी या तीन गोष्टींना द्यावे लागेल.

दिलीप रॉयचे वेडयांच्या हॉस्पीटलमधून पलायन वास्तवतेच्या दृष्टीने कृत्रिम वाटते. अनेक पोलीस पाठीवर असूनही हा पठ्ठा पळून जाण्यात यशस्वी होतो. धुके आणि पाऊस यांची यावेळची दृश्ये मात्र उत्कृष्ट आहेत. या दर्जाचे तांत्रिक कौशल्य क्वचितच पहावयास मिळते. या चित्रपटाची निर्मिती केवळ एक महिन्याच्या कालावधीमध्ये केली असूनही निर्मितीची बाजू जवळजवळ परिपूर्ण आहे. रंगीत छायाचित्रण, सलगता व दर्जा या दृष्टीने उत्कृष्ट आहे. कॅमेऱ्याच्या कलात्मक वापराच्या दृष्टीने मात्र फारसे समाधान मिळत नाही. चित्रपटाची मूळ कथा नाटका-वर आधारीत असली तरी चित्रपटाचे नाटक होऊ न देण्यात आणि प्रत्येक दृश्याला सिनेमॅटीक टच देण्यात दिग्दर्शक यश चोप्रा चांगलेच यशस्वी झाले आहेत. कॅमेरा, ध्वनी, संकलन, पार्श्वसंगीत आणि कलाकारांकडून करवून घेतलेला अभिनय या सर्वांची उत्कृष्ट सांगड घालून एक रहस्यकथा तांत्रिकदृष्टया उत्कृष्टपणे सादर करण्यात त्यांनी चांगलेच यश मिळवले आहे.

चित्रपटातील प्रमुख घटना जगमोहन यांच्या घरी घड-तात. त्यांच्या घराचा मोठा सुंदर सेट कलादिग्दर्शक श्री. गायकवाड यांनी उभा केला आहे. या सेटचा वापरही दिग्दर्शकाने मोठ्या कौशल्याने करून घेतला आहे.

चित्रपटाला श्री. सलील चौधरी यांनी पार्श्वसंगीत दिले आहे. सर्वसाधारण रहस्यपटाला



असते तसेच त्यांच्या पार्श्वसंगीताचे स्वरूप आहे. क्वचित प्रसंगी ते तापदायकही आहे. कान फाडून टाकणाऱ्या शोक वगैरे टाळून काही नवीन प्रयोग केले असते तर त्यांचे अधिक स्वागत झाले असते. जे पार्श्वसंगीताच्या बाबतीत तेच काही दृश्यांच्या बाबतीत म्हणावे लागेल. दिग्दर्शकाने शोक दृश्य देण्याचा मोह टाळला असता तर बरे झाले असते. साध्या सरळ रहस्यकथेतून शेवटी काही नीतीतत्त्वे सांगण्याचा जो प्रयत्न केला आहे, ती अतिशय हस्यास्पद आहे. चित्रपटाच्या प्रारंभीची रंगसंगतीची दिवाळी ही विषयाशी जुळणारी नाही.

चित्रपटाची कथा अतिशय ठिसूळ असल्याचे प्रारंभी सांगितले आहेच. तथापि रहस्यभेद न करताही एका गोष्टीची नोंद करणे आवश्यक आहे. ऐन मध्यरात्री जगमोहनला आलेल्या टंक कॉलवरून रहस्य भेद होण्यास सुरुवात होते. तथापि हा ट्रंककॉलची प्रकारच न पटणारा आहे.

कलाकारांपैकी उत्कृष्ट कामगिरी नंदाने बजावली आहे. विनायकाच्या या गुणी कन्येने चांगली भूमिका आपल्या वाट्याला आली तर आपण त्याचे सोने करतो हे सिद्ध केले आहे. 'आज और कल' या वसंतराव जोगळेकरांच्या चित्रपटानंतर तिची इतकी चांगली भूमिका पहावयास मिळाली नव्हती.

राजेश खन्ना हा काही देखणा किंवा अंगापिंडाने भरलेला दणकट नट नव्हे. तरीही आपल्या कलागुणांची त्याने चांगली प्रगती केली आहे. या चित्रपटातही प्रारंभीचा आक्रस्ताळेपणा सोडल्यास त्याने बजावलेली कामगिरी समाधानकारक आहे. छोटचा भूमिकेत इफ्तेकार (इन्सपेक्टर-कर्वे), आपल्या संयमी अभिनयाने लक्ष वेधून घेतात. गजानन जागीरदार (डॉ. त्रिवेदी), शम्मी (शेजारीण) यांनीही छोटचा भूमिकांमधून रंगत आणली आहे.

चित्रपटात गाण्यांना आणि नृत्यांना पूर्ण फाटा दिला आहे. त्याची कसर नंदाला अतिशय 'सेक्सी अपीअरन्स' देऊन भरून काढली आहे.

बी. आर. फिल्मसच्या या चित्रपटाचे निर्विवादपणे स्वागत होणे आवश्यक आहे. नृत्य, गाणी यांना पूर्ण फाटा देऊन केवळ बारा रिळांमध्ये (मुख्य चित्रपट इंग्रजी चित्रपटाप्रमाणे विश्रांतीनंतर सुरू होतो) त्यांनी चित्रपट चांगला आवळून बांधला आहे.

-शरद कृष्णन्

**प्रक्षुब्ध अहमदाबाद** [पृष्ठ ७ वरून]

मांडल्याचे ऐकिवात नाही. येथे तो असे वागला असला तर ते फारच अस्वाभाविक वर्तन होते. त्याला काही पार्श्वभूमी घडली का? इन्स्पेक्टर खान यांचे त्या आधीच्या त्यांच्या सर्विसचे रेकॉर्ड काय सांगते? तेथे काही बाचाबाची झाली काय? पोथीस लाथ मारण्यासाठी इन्स्पेक्टर आले त्यावेळी त्यांना काही अंतर चालून यावे लागले असणारच. त्यांचा मूड ही दिसत असणार. त्यांना कोणीच अडविले कसे नाही? लाथ मारलीच असेल तर, नंतर त्यांना कोणीच हटकले कसे नाही? जर हटकले असेल तर तेथील हिंदु अपेते हे शांतिप्रिय म्हणायचे की भ्याड, नादान म्हणायचे? एक वृत्तपत्रकार म्हणून श्री. कृष्णन् यांच्या मनात हे प्रश्न उभे राहायला हवे होते, असे मला वाटते. व त्यांना जी माहिती मिळाली ती त्यांनी तपासून पाहायला हवी होती. श्री. दलवाई यांनी ऐकले ते असे की, दिवे गेले, अंधारात झालेल्या धावपळीत पोथी खाली पडली, गेली. खरे काय घडले त्याचा तपास आता चौकशी कमिशन घेईलच.

मुसलमान समाजाबद्दलचा अविश्वास अलीकडे वाढला आहे, त्यांच्या अवाजवी मागण्यांच्या राजकारणाबद्दल सर्वसामान्य हिंदू समाज चिडलेला आहे, अल् अक्सा मशीद जळित प्रकरणी निघालेल्या मिरवणुकीचा – विशेषतः त्यातील घोषणा, सभा-मधील 'जिहाद'ची भाषा – यांचा अत्यंत प्रक्षोभक परिणाम झाला आहे, ही कोणालाही दिसणारी वस्तुस्थिती आहे. जगन्नाथ मंदिरावरील हल्ला ही ठिणगी ठरली असल्यास, गोष्ट समजण्यासारखी आहे.

या हल्ल्याच्या बातमीने 'हिंदु–मुसलमानांच्या स्वातंत्र्योत्तर काळातील अभूतपूर्व दंगलीला तोंड फुटले.' अभूतपूर्व या विशेषणाबरोबर येणारा सहचरी अर्थ, ज्या गोष्टीस ते विशेषण लावलेले असते ती गोष्ट चांगली आहे असे सूचित करणारा असतो, अशी माझी समजूत आहे. या शब्दाचा वापर श्री. कृष्णन् दोन वेळा करतात. तेव्हा, चुकून त्या शब्दाचा वापर केला गेला असे म्हणणे कठीण आहे. हिंदु–मुस्लिम संघर्ष जोवर आजच्याइतका तीव्र आहे व तो निवळावा या दृष्टीने जोवर पावले पडत नाहीत – ती पावले फक्त मुसलमानांनीच टाकावीत असे वादापुरते गृहीत धरू आणि – तोवर दंगली अटळ आहेत, ही भूमिका समजू शकते. पण अटळ असली तरी ती दंगल आहे, ती घडली याबद्दल खेदच व्हायला पाहिजे. दंगलीला 'अभूतपूर्व' हे विशेषण लावण्याची भावना त्या घटनेबद्दल मनात यावी?

आणखी ही दंगल तरी कशी होती? दोन सशस्त्र जमाव एकमेकांची डोकी फोडताहेत, मारताहेत–मारले जाताहेत, ही एकपक्षीय दंगल. ही दंगलही माझ्या मते

अविवेकी व दुःखदच. पण अशा दंगलीच्या बाबतीत हिंमत, वीरता तरी आहे. हिंदु-मुस्लिम वैमनस्याच्या संदर्भात, अहिंसेवर निष्ठा नसणाऱ्यांनी, वीराची हिंसा करावी (पण भ्याडाची अहिंसा वा भ्याडाची हिंसा करू नये) असे गांधी सांगत आले. पण अहमदाबादच्या दंगलीचा जो वृत्तांत श्री. कृष्णन् यांनी दिला आहे त्यावरून हिंदु-मुसलमान, दोघांनी भ्याडाची हिंसा केली असे स्पष्ट होते. मुले, स्त्रिया, वृद्ध यांचीही हत्या झाली असे त्यांनी लिहिले आहे. आपण बहुसंख्य आहोत हे पाहून दोघांनी हत्या केली, जाळपोळ केली. ही दंगल करणाऱ्यांबद्दल घृणा वाटली पाहिजे व दंगलीत ज्यांची हानी झाली त्यांच्या बाजूने आवाज उठवला पाहिजे.

दंगलखोरांची निर्भर्त्सना श्री. कृष्णन् यांच्या लेखात आढळत नाही हे खटकते. पण त्याहीपेक्षा खटकते ती ही गोष्ट की, त्यांनी वृत्तांत असा कथन केला आहे की, हिंदूंना झुकते माप मिळावे. ते लिहितात, 'मुस्लिम बहुसंख्य भागात देवळांवर छोटे हल्ले, किरकोळ दगडफेक झाली. शक्य झाले तेथे शस्त्रेही चालविण्यात आली. हिंदुसमाजाला चिरड यावी असे अनेक प्रयत्न सहेतुक केले गेले. अर्थात असे प्रयत्न करणारांनाही हा गलथान समाज इतक्या आक्रमक स्वरूपात प्रतिकार करू शकेल याची कल्पना आली नाही.'...'मुसलमानांना या हानीची कल्पना नव्हती तर हिंदू या दंगलीत त्यांच्या इच्छेविरुद्ध मुसलमानांच्या आक्रमक चालीमुळे आणि शासनाच्या गलथानपणामुळे ढकलले गेले. 'सेवक'सारख्या दैनिकाने दिलेल्या एकांगी वृत्ताचा प्रतिकूल परिणाम झाला.'

दंगलीमागील घटनांची साखळी व कारणपरंपरा आणि दंगलीतले वर्तन या दोन अलग अवस्था आहेत. श्री. कृष्णन् यांची वरील वाक्ये लेखाच्या ज्या भागात येतात त्या भागात ते दंगलीत घडलेल्या घटनांचे वर्णन करीत आहेत, त्यावेळच्या वर्तनाची चिकित्सा करीत आहेत. त्यांनीच दिलेली माहिती काय सांगते ? जीवित-हानी फार मोठ्या प्रमाणावर मुसलमानांची झाली. त्यांच्या मशिदी तोडल्या. घरेदारे उध्वस्त झाली. त्यामानाने हिंदूंची प्राणहानी कमी झाली. निर्वासित छावण्यात बहुसंख्य मुस्लिम होते. याचा सरळच अर्थ असा होतो की, एकदा दंगल उसळल्यावर, मुसलमान पुढे व हिंदू बिचारे नाखुषीने मागून ढकलले जाताहेत, अशी स्थिती नव्हती. दोन्ही जमातीतील लोक पिसाट झाले. लोकसंख्येचे गणित लक्षात घेता मुसलमानांना झळ खूप अधिक पोचणे ही गोष्ट अटळ होती. पण श्री. कृष्णन् यांनी, दंगल उसळल्यावरही, हिंदू बचावात्मकच भूमिकेत होते, इच्छे-विरुद्ध कृत्ये त्यांना करावी लागत होती, असा आभास निर्माण करणारे पक्षपाती लेखन का करावे ?

'सेवक' या वृत्तपत्रातील वृत्तात एकांगी होते असे श्री. कृष्णन् लिहितात. हे वृत्तपत्र कोणत्या जमातीच्या बाजूने पक्षपात करीत होते, ते स्पष्ट करणे हे त्यांचे

कर्तव्य होते. श्री. कृष्णन् एके ठिकाणी असेही लिहितात की, 'आकडे फुगवून जाहीर केले जात होते. विपरीत वृत्त पद्धतशीरपणे पसरवले जात होते. आपल्या लेखात ते आणखी एका ठिकाणी असे म्हणतात: 'परंतु उपनगराचा फेरफटका भारीत असताना झालेल्या नुकसानीची आणि नुकसान करण्यामागे असलेल्या शक्तींच्या संघटित सामर्थ्याची कल्पना येत होती.' विपरीत वृत्त पद्धतशीरपणे पुरवत कोण होते? ज्या शक्तींचे सामर्थ्य संघटित होते त्या शक्ती कोणत्या? ही विधाने केल्यावर त्यावर थोडा अधिक प्रकाश टाकण्याची जबाबदारी श्री. कृष्णन् यांच्यावर येते.

श्री. कृष्णन् यांच्या लेखात कुरेशी पिता-पुत्रांवरील हल्ल्याचा ऊहापोह आहे. श्री. कुरेशी (वडील) हे अल् अक्सा मशीद जळित प्रकरणी निघालेल्या मिरवणुकीत होते व 'त्याची दखल जमावाने घेतली' अशा शब्दात त्यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा खुलासा ते करतात. ज्या पद्धतीने त्यांनी हे वाक्य लिहिले आहे त्यावरून हा खुलासा श्री. कृष्णन् यांना समाधानकारक वाटतो असे दिसते. दखल घेण्याची ही पद्धती केव्हाही निषेधार्हच मानली गेली पाहिजे असे मला वाटते. पश्चिम बंगालमध्ये राजकीय कार्यकर्त्यांचे आज खून पडत आहेत. त्यांचाही खुलासा असा करता येईल हे विसरता कामा नये. माझ्या जीवितवित्तावर शारीरिक हल्ल्याच्या स्वरूपाची जी कृती नाही तिची दखल या प्रकारे घेणे हे कृत्य आपण गर्हणीय मानले तरच देशात निकोप सार्वजनिक व वैयक्तिक जीवन शक्य होईल. बॅरिस्टर कुरेशी (पुत्र) यांच्याबद्दलचे एक विधान तर सर्वस्वी निषेधार्ह आहे. 'बॅरिस्टर साहेबांनी हिंदु मुलीशी लग्न केल्यामुळे व त्यांच्या चारित्र्यावद्दल वेडेवाकडे ऐकू येत असल्याने जमावाचा त्यांच्यावर राग होता.' असा आरोप कोणीही कोणावर घेऊ शकतो. हे चारित्र्यहनन आहे व सार्वजनिक जीवनात ही गोष्टही गर्हणीय मानली पाहिजे. मुसलमानाने हिंदु मुलीशी लग्न करणे हे कोणाकोणाला आवडत नाही ही एक जाहीर गोष्ट आहे. पण लग्न ही एक खाजगी बाब आहे व खाजगी जीवनाचे पावित्र्य व अभंगत्व राखले पाहिजे. एखाद्या व्यक्तीचे खाजगी जीवन हे मला वेडेवाकडे वाटले तरी, जोवर सार्वजनिक व्यवहारावर त्याचा आघात होत नाही तोवर ते सार्वजनिक चव्हाट्यावर आणता कामा नये, हे पथ्यही निकोप सार्वजनिक जीवनासाठी आवश्यक आहे.

स्वातंत्र्यानंतर पूर्वीचा सत्ता-समतोल बदललेला आहे ही गोष्ट मुस्लीम नेतृत्वाने जाणलेली नाही, ही एक सर्वसामान्य गोरगरीब मुसलमान जनतेची शोकांतिका आहे. ब्रिटिश राज्यसत्तेच्या टेकूमुळे, प्रशासनयंत्रणेच्या प्रच्छन्न सहानुभावामुळे धर्मपरायण मुसलमानाच्या भावना चेतवून, दांडगाईचे राजकारण करणे तेव्हा परवडत होते. आता त्याच जुन्या तंत्रांनी राजकारण करू गेल्यास अहमदाबादचीच पुनरावृत्ती अटळपणे घडेल याचे भान मुस्लीम नेतृत्वाला होईल अशी आशा करू या. पण नेत्यांनी तशी समज दाखविली नाही, तर सर्वसामान्य मुसलमान जनतेने या नेतृत्वास झटकून टाकले पाहिजे.

सर्वसामान्य माणसे प्रक्षुब्ध चिथावणी होत नाहीत; पण झाली म्हणजे ती पिसाट बनतात. दंगली घडून येतात याचा दोष आपण मुस्लिम नेतृत्वावर टाकत असतानाच, घडून आलेल्या दंगलीबद्दल क्लेश व दुःखच व्हायला पाहिजे. कारण माणसे कोणत्याही जमातीतील असोत, पिसाट बनली की ती पशू बनतात व माणुसकीचा बळी पडतो. हेच अहमदाबादलाही घडले. म्हणून, मुस्लिम समाजाला व विशेषतः नेतृत्वाला कडक समज देत असतानाही (ज्याची गरज आहे), दंगल उसळण्यापूर्वीच प्रक्षोभक भाषा व कृत्य यांना आळा घालण्यासाठी लोकांनी व शासनाने खंबीरपणे पुढे आले पाहिजे. दंगलीमध्ये बळी पडणारी माणसे, हिंदु वा मुसलमान, बव्हंशी गोरगरीब, निरपराध असतात हे लक्षात घेऊन, चुकीचे वर्तन करणाऱ्या समाजाला धडा शिकविण्याचा हा मार्ग नाही, हेही भारतीयांनी मनोमन स्वीकारले पाहिजे. एरवी चंदीगड, बेळगाव, तेलंगण, विदर्भ असे अनेक प्रश्न आहेत की, जेथे अहमदाबादमध्ये धर्मावरून जे घडले, तेच भाषेवरून, एकाच भाषिकातील उपगटांवरून घडून येईल; व तेथेही याच पद्धतीचा तितकाच असंतुष्ट आविष्कार झालेला पहाण्याचे दुर्भाग्य आपल्या सर्वांवर ओढवेल. तसे झाले तर, वरपांगी राज्यसत्ता एक राहिली तरी, भारताची छकले पडतील. हा धोका टाळण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे.


# पुरंदऱ्यांची दौलत

श्रीमंत बाजीराव पेशवे / तुळशीबागवाला / खासा फिरंगी मारिला / जिद्द / खासगीवाला / खंडेराव दरेकर / तलवारीचे पाते / पालखी / पुरंदऱ्यांची दौलत

नऊ पेशवेकालीन कथा

ब. मो. पुरंदरे

किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-649


रशियन राज्यक्रांतीविषयी प्रचारात्मक
साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या
नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला
मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

प्रस्तावना : ना. ग. गोरे

लेखक : वि. स. वाळिंबे

मूल्य : अठरा रुपये

राजहंस प्रकाशन : १०२५ सदाशिव पेठ : पुणे ३०